नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

गो. रा. दोडके
अरविंद मंगरूळकर
वसंत माधव
गुणाकर देशपांडे
मनोहर म. देशपांडे
दि. वा. फडणवीस
शरच्चंद्र मुक्तिबोध
शांताराम
प्रा. म. र. आष्टीकर

याशिवाय

आश्रमहिमा
संघवार्ता इत्यादि

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

आठवें | अंक दुसरा-तिसरा | किंमत आठ आणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

संपादक मंडळ :
श्री. ह. ना. नेने
प्रा. के. ज. पुरोहित
श्री. गो. रा. वोडके
श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध
प्रा. अ. ना. देशपांडे

संपादक :
श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

आभार—

'युगवाणी'चा प्रस्तुत अंक हा हरिहरेश्वर प्रेसमधून बाहेर पडणारा शेवटचा अंक. 'युगवाणी'च्या आरंभापासून तों आजपर्यंत ठाकूर आणि कंपनीने जास्तीत जास्त झीज सहन करून युगवाणीचें संवर्धन केलें. या अकाबरोवर युगवाणीचा हरिहरेश्वर प्रेसशीं व्यावहारिक संबंध जरी संपला असला तरी विदर्भ साहित्य संघाचा व ठाकूर आणि कंपनीचा ऋणानुबंध कायमच आहे.

श्री. बाळासाहेब ठाकूर आणि त्यांचे सहकारी श्री. उन्हाळे, श्री. बेलवलकर, श्री. गाडगे आणि श्री. गुप्ते यांची 'युगवाणी' फार आभारी आहे.

—संपादक 'युगवाणी'

पत्रव्यवहाराचा पत्ता :
"युगवाणी" कार्यालय,
विदर्भ साहित्य संघ
उत्तर अंबाझरी रस्ता,
नागपूर १.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

हा जोड अंक कां ?

युगवाणीचा प्रस्तुत अंक मे जूनचा जोड अंक म्हणून काढण्यांत आला आहे. युगवाणीचें प्रकाशन यापुढे दर महिन्याच्या पहिल्या तारखेस करण्याचें ठरलें असून, प्रकाशनाच्या सोयीसाठी हा जोड-अंक काढला आहे. यापुढे वाचकांना दर महिन्याच्या पहिल्या तारखेस अंक पोचेल अशी व्यवस्था संपादक मंडळ करीत आहे. यामुळे युगवाणीच्या पानांची जी थोडी बचत होईल त्याची भरपाई दिवाळीच्या वेळीं मोठा अंक काढून केली जाईल. 'युगवाणी'च्या वर्गणीदारांना ही योजना पसंत पडेल, अशी उमेद आहे.

● ● ●

युगवाणीच्या संवर्धनाचें फार मोठें श्रेय तिचे माजी संपादक प्रा. वा. कृ. चोरघडे यांच्या कष्टाला व कार्यतत्परतेला आहे. त्यांचे व त्यांच्या संपादक मंडळाचे आम्ही आभारी आहोंत.

● ● ●

युगवाणीच्या 'एप्रिल'च्या अंकाच्या मुखपृष्ठावर जें छायाचित्र आहे तें मोझरीच्या गुरुकुंज आश्रमांतील प्रार्थना मंदिराचें आहे. वि. सा संघाचें गेलें संमेलन याच आश्रमांत भरलें होतें.

● ● ●

याच अंकांतील 'एक दुर्दैवी महान् कलावंत,' या लेखावर लेखिकेचें नांव द्यावयाचें राहून गेलें, याबद्दल खेद वाटतो. प्रस्तुत लेख कलकत्त्याच्या सौ. तारा पंडित, एम्. ए. [सोशल सायन्सेस] यांनी Herman J. Weihsler च्या Lives of Famous French Painters या पुस्तकाच्या आधारें लिहिला आहे.

● ● ●

राजभाषा अधिनियम

राजभाषा अधिनियमाबद्दल संघाच्या एतद्विषयक समितीने जें कार्य केलें आहे, त्याला मोझरीच्या संमेलनाने मान्यता दिलीच आहे. या बाबतींत संघाची भूमिका स्पष्ट असून, त्यादृष्टीने त्याने स्वीकारलेलें धोरण व कार्य जनतेपुढे ठेवलेलेंच आहे. या बाबतींत संघावर मुंबईच्या एका दैनिकांत एक टीकालेख येऊन गेला आहे. तो टीकालेख संघाची भूमिका स्पष्ट न समजून घेतां लिहिलेला आहे हें उघड आहे. संघाचें शिष्टमंडळ मुख्य मंत्री पं. रविशंकर यांना भेटलें असता त्यांनी असें स्पष्ट आश्वासन दिलें आहे की, मराठी व हिंदी भाषेला राज्यात समान दर्जा दिला जाईल; मराठीला अन्याय केला जाणार नाही. व सध्याच्या अधिनियमाच्या कलम चारमध्ये मराठीचाहि अंतर्भाव केला जाईल. येत्या ता. १५ ऑगस्टपासून मध्यप्रदेशांत इंग्रजी ऐवजीं मराठी व हिंदींतून राज्यकारभार सुरू करण्यांत येणार आहे. त्यासाठीं आवश्यक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

तो हुकूम काढतांना मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल हे वरील आश्वासन लक्षांत ठेवतील व त्याची अंमलबजावणी होईल असाच हा हुकूम ते काढतील असा विश्वास आम्ही बाळगतो. या बाबतींत संघाने जें निवेदन मुख्य मंत्र्यांना सादर केलें आहे, तें काळजी-पूर्वक वाचणाऱ्याच्या मनांत संघाच्या भूमिकेबद्दल संदेह उरण्याचें कारण आहे, असें आम्हाला वाटत नाही.

• • •

अण्णाराव मिरजी

कित्येकदा वर्तमानपत्रांमधून बातम्या झळकतात, " पोस्टमनच्या जागेकरिता मॅट्रिक झालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज, " "कारकुनाच्या जागेकरितां तीन हजार विश्वविद्यालयाची उपाधी घेतलेल्यांचे अर्ज." या प्रकारच्या बातम्या देतांना उपाधीविषयी उपेक्षेची, तुच्छतेची भावना प्रकट केली जाते. एखाद्या आफिसांतील सुपरिंटेंडंट तर आपल्या शालूसोबत्याजवळ " माझ्या हाताखाली इतके ग्रॅज्युएट्स् आहेत, एम्. ए. आहेत, त्यांतले चार तर डिस्टिंक्शन मिळवणारे आहेत आणि दोन तर फर्स्टक्लास फर्स्ट आहेत, " अशी फुशारकी मारतो. त्याच्या म्हणण्याचा उद्देश असतो, " आम्ही तर फाटके मॅट्रिक, पण आमच्या हाताखाली आमच्यापेक्षा खूप शिकलेले लोक असतात. आम्ही त्यांचा असा पाणउतारा करतों, त्यांना असे सतावतों. पण ताब नाही त्यांची डोळे वर करून आमच्याकडे पाहण्याची. अहो कांही झालं तरी आम्ही मुरब्बी. यांना एवढं तेवढं देखील कळत नाही. अहो एका एम्. ए. ला तर मी आपल्यासमोर चार तास उभं करून ठेवलं, खुर्चीवर बसा म्हटलं नाही न कांही नाही ". एकूण काय, आमच्या व्यवहारांत उपाधीला किंमत नाही.

अण्णाराव मिरजी या नांवाचे एक कन्नड साहित्यिक आहेत. त्यांनी जैनधर्मावर ग्रंथ लिहिला आहे, आणि तो प्रमाणहि मानला जातो. त्यांच्या कादंबरीला एका वर्षी ती सर्वोत्कृष्ट ठरल्यामुळे पारितोषिक मिळालें आहे. म्हैसूर दरबारने त्यांचा सन्मान केला आहे. वाचकवर्गाने त्यांचें साहित्य जिवाशीं धरलें आहे.

अण्णाराव मिरजी हे प्राथमिक शाळेंत शिक्षक आहेत. त्यांना चाळीस रुपये पगार आणि पस्तीस रुपये महागाई मिळते. पण यानंतर मात्र पगारांत वाढ नाही. पगारांत वाढ व्हावी म्हणून यावर्षी ते मॅट्रिकच्या परीक्षेला बसले आहेत. आजच्या काळांत ज्यांना परीक्षांचें, उपाधींचें महत्व वाटत नाही, ते स्वतःची वंचना करतात, आणि इतरांना फसवतात असें म्हणायला कांहीच हरकत वाटत नाही इतकेंच नव्हे तर वर सांगितलेल्या बातम्या देणारे वर्तमानपत्रकार आणि उपाधि प्राप्त करणारांची हेटाळणी करणारे सुपरिंटेंडंट हेहि आपल्या वागणुकीने उपाधीचें कौतुकच करतात, आणि याच कारणाने अण्णाराव मिरजी यांना साहित्यिक या नात्याने लौकिक आणि प्रतिष्ठा मिळून देखील मॅट्रिकच्या परीक्षेला बसावें लागतें.

• • •

मामा वरेरकर

आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासांत मामा वरेरकरांचें स्थान मानाचें आहे, मोलाचें आहे. दोन महिन्यांपूर्वी त्यांच्या जीवनाचीं सत्तर वर्षे पूर्ण झालीं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि त्यांची एकाहत्तरी सुरु झाली. वयाचा परिणाम त्यांच्या शरीरावर तर निश्चितच होणार. परंतु त्यांच्या साहित्यसेवेवर व मनावर काळानें आपला प्रभाव गाजवला नाही. नाट्यलेखनाच्या काळांत यश पदरांत पडत असतांना जी ईर्षा, जो हुरूप त्यांना वाटला असेल तोच आज आपल्या जीवनांतील आठव्या दशकांत पदार्पण करतांना त्याना वाटत आहे. आजहि त्यांचें मन नवीन कल्पनांनी, नवीन संकल्पांनी, नवीन विजिगीषेनें परिपूर्ण भरलेलें आहे. आजवर कार्यक्षेत्र म्हणून महाराष्ट्राच्या सीमांनीं तें मर्यादित झालें होतें. आज त्यांचें म्हणणें आहे, महाराष्ट्रीयांनी दिल्लीवर नजर ठेवावी, महाराष्ट्राने आपल्या कर्तृत्वाच्या सीमा विस्तृत कराव्या. त्यांचे हे विचार निराधार नाहीत. त्यांचीं स्वतःचीं दोन नाटकें दिल्लीच्या रंगभूमीवर यायचीं आहेत. एक 'भूमिकन्या सीता' व दुसरें 'अपूर्व बंगाल'. दोन्ही भाषांतरित स्वरूपांत आहेत. आणि यालाच अनुलक्षून मामांनी महाराष्ट्रीयांनी आता दिल्ली डोळ्यासमोर ठेवावी अशा आशयाचे विचार प्रगट केले आहेत.

नवीन नवीन विषय घ्यायचे आणि त्यांची नाट्यात्मक मांडणी करायची हा त्यांचा हव्यास तरुण आहे. गुप्त पोलिसी कथेवर त्यांना नाटक उभारायचें आहे. मासाच्या जीवनावर नाटक लिहायचें आहे आणि याच प्रकारचे अनेक विचार त्यांच्या मनांत आज खेळताहेत. निवृत्तीचे विचार ज्यावेळेला सर्वसामान्य माणसाच्या अंतःकरणांत निर्माण व्हावे, त्यावेळेला या मराठी भाषेच्या सेवकाचें अंतःकरण प्रवृत्तिपर विचारांनी परिपूर्ण भरलेलें आहे. आजवरच्या कर्तृत्वाकडे बघून समाधानाचा उसासा टाकण्याचा हा त्यांच्या जीवनांतला काळ. परंतु मामा तेवढ्याच कर्तृत्वावर समाधानी राहायला तयार नाहीत.

समाधानी व्हायला त्यांनी केलेलें कार्य केवढें तरी मोठें आहे. मराठीतलें त्यांचें नाट्यसाहित्यच घेतलें तर कृतकृत्य वाटावें एवढें भरघोस आणि गुणवान. त्यांनी कादंबरी साहित्यांतहि धांवता धोटा, गोंदु गोखले, सात लाखांतील एक अशा कादंबऱ्यांनी भर घातली. कथासाहित्यांतहि त्यांनी भर टाकली आहे. अशा प्रकारनें मौलिक साहित्य निर्माण करणाऱ्याने शरत्साहित्य मराठांत आणलें. आपल्या नाट्की संसाराचें चित्रहि त्यांनी रेखाटलें. अजून तें अपूर्ण आहे. साहित्याच्या निरनिराळ्या क्षेत्रांत कार्य करणारे जे थोडेसे लेखक आढळून येतात त्यांच्यापैकी मामा एक होत.

मामांविषयी लिहितांना अनेकदा अनादराची भाषा वापरली जाते. या प्रकारामागे ज्या वैयक्तिक भावना असतील त्या असोत. त्या भावना आता आवरल्या घेतल्या पाहिजेत. वयोमानाप्रमाणें माणसाकडे बघण्याची दृष्टि बदलायला हवी. वैमनस्य, हेवेदावे यांना मूठमाती देऊन गुणग्राहक वृत्तीने वयस्क साहित्यिकाकडे बघायला हवें. आणि आपल्या साहित्यानें ही प्रतिष्ठा आपल्याला मिळवून दिली हें समाधान त्याला मिळायला हवें. तें मिळवून देणें हें प्रत्येक मराठी लेखकाचें कर्तव्य आहे.

केवळ आपल्या लेखणीच्या बळावर जगणारे जे थोडेसे साहित्यकार मराठी भाषेची सेवा करताहेत त्यांच्यामध्ये मामा वरेरकर अग्रगण्य आहेत. दीर्घ कालापासून त्यांनी साहित्य हेंच जीवन मानलें आहे. आणि त्यांची उपजीविका त्यावरच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विसंबून आहे. गुप्तपोलिसी चातुर्याच्या कथा ते लिहूं लागल्यावर कांही लोकांना त्यांच्याविषयी खरा म्हणा, खोटा म्हणा कळवळा वाटूं लागला आणि वर्तमानपत्रांतून तो प्रकटहि होऊं लागला. मामांनी त्यावेळेला उद्देशून लिहिलें, "माझ्या योगक्षेमाची काळजी वाहण्यापेक्षा माझें साहित्य वाचाल, त्याची बूज कराल तर तेंच मला समाधानाचें वाटेल." या प्रकारचें उत्तर लोक नीटपणे स्वीकारूं शकत नाहीत. उलट त्याच्या परिणाम विपरीत होतो. आपण एवढा जीव तोडून सहानुभूति दाखवतो आणि हे तर कृतज्ञता प्रकट करण्याऐवजी आपल्यालाच गोष्टी ऐकावितात. यामुळे कित्येकांच्या मनांत अढी बसते. पण त्यांना एवढी एक गोष्ट ध्यानांत ठेवतां येईल की, साहित्यकार आपल्या स्वतःपेक्षा, आपल्या योगक्षेमापेक्षा आपलें साहित्य मोलाचें मानतो.

चार तपांहून जास्त काळपर्यंत मामांनी साहित्यसेवा केली आणि आजहि त्या सेवेंतील जोम ओसरला नाही. याला एक दोन कारणें आहेत. आपल्या समाजांत ज्या उणीवा होत्या, ज्या समस्या होत्या, जे वारे वाहत होते, जे प्रवाह वाहत होते, त्या सगळ्यांची त्यांना जाणीव होती. 'हाच मुलाचा बाप,' 'सत्तेचे गुलाम,' 'सोन्याचा कळस,' 'गोदू गोखले,' 'जिवा शिवाची भेट,' 'सात लाखांतील एक' या नाटकातून अथवा कादंबऱ्यांतून महाराष्ट्रांतील कालौघाची आणि विचारौघाची दिशा नीट कळून येते. त्याचप्रमाणे नाटक लिहितांना त्यांचें मन प्रयोगशील राहिलें. नाटकाचा काळ, त्यांतील विषय, त्याची सजावट या सगळ्यां बाबत त्यानी नवनवीन प्रयोग करून पाहिले. आणि याच कारणाने वरेरकरांची रंगभूमि आजहि जिवंत आहे, कार्यक्षम आहे. माणसाच्या मनावर मात करणाऱ्या काळाला त्यांनी आपल्या मनावर मात करूं दिली नाही. यामुळेच नवीन कलाकृति निर्माण करतांना नवीन हुरूप, नवीन ईर्षा त्यांच्या मनांत भरून येते. त्यांचें मन चिरतरुण राहतें. त्यांचें मन सदाच चिरतरुण राहून मराठी साहित्यांत यापुढेहि सारखी भर पडत राहो, ही हार्दिक सदिच्छा. आणि त्यांनी त्यांच्या जीवनाच्या आठव्या दशकांत प्रवेश केला याबाबत त्यांचें हार्दिक अभिनंदन.

• • •

युक्तप्रांत सरकारचें साहित्यप्रेम

गेल्या महिन्यांत युक्तप्रांत सरकारने हिंदी भाषेंतील पुष्कळशा उत्तमोत्तम पुस्तकांना अडीचशे रुपयांपासून ते बाराशे रुपयांपर्यंतची एकंदर अठ्ठावीस हजार रुपयांहून जास्त किमतीचीं पारितोषकें वाटून जी गुणग्राहकता व्यक्त केली त्याबद्दल तें सरकार अभिनंदनास पात्र आहे. हिंदींत दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या उत्तमोत्तम पुस्तकांना पुरस्कार देण्याचें हें धोरण अखिल भारतांतील हिंदी लेखकांना व त्यांच्या लिखाणाला खात्रीने प्रोत्साहन देईल. ज्या भाग्यवंत व गुणी लेखकांना पारितोषिकें मिळालीं आहेत त्यांत नवीन–जुने, युक्तप्रांतीय व युक्तप्रांताबाहेरील असे सर्वच प्रकारचे लेखक आहेत. काश्मीरच्या श्रीमती कृष्णा मेहता जशा त्यांत आहेत तसेच आंध्रचे नारनसी कृष्णमूर्तिहि आहेत; खांडव्याचे वृद्ध साहित्यिक पं. माखनलाल चतुर्वेदींसारखे राष्ट्रीय लेखक जसे त्यांत आहेत तसेच पं. राहूल सांकृत्यायनासारखे साम्यवादीहि आहेत. पारितोषक–समितीने वाङ्मयाचा कोणताहि प्रकार निषिद्ध मानला नाही. किशोर–साहित्यापासून तों अर्थशास्त्रापर्यंत सर्व प्रकारांना समितीने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आश्रय देऊन आपली बहुविध रसिकता प्रगट केली आहे. आपल्या लेखनकृतींचे महत्व शासनकर्त्यांना पटवून देण्याची कामगिरी बजावल्याबद्दल हिंदी लेखकहि अभिनंदनास पात्र आहेत.

ज्या पुस्तकांना पारितोषिकें मिळण्याचा सन्मान प्राप्त झाला तीं चांगलीं आहेतच; पण त्या तोलाचे लेखक व लिखाण भारतांतील अन्य भाषांतहि आहेत. निरनिराळ्या प्रदेश-सरकारांनी आपआपल्या राज्यांतील प्रादेशिक भाषांना या पद्धतीने उत्तेजन देण्याचा पायंडा पाडला पाहिजे–कांहीं राज्यसरकारांनी त्याची तरतूद केली आहेच. सर्वच प्रदेश-सरकारें अशा प्रकारें अखिल भारतीय साहित्याला प्रोत्साहन देतील तो दिवस भारताच्या इतिहासांत मोठ्या भाग्याचा ठरेल यांत शंका नाही.

● ● ●

कविसम्राट् रवींद्रनाथ ठाकूर

ता. ६ मे १९५३ हा विश्वकवि रवींद्रनाथ यांचा जन्मदिवस असल्याने तो नागपुराप्रमाणे इतरत्रहि मोठ्या उत्साहाने साजरा केला गेला असेल यांत संशय नाही. त्यांची सुप्रसिद्ध ' गीतांजलि ' इ. स. १९१० ते १०२२ च्या लोकांच्या पुढे आली व ' आशियाचे कविसम्राट ' म्हणून त्यांना स्पृहणीय ' नोबेल प्राईझ ' मिळून, एका भारतीय कवीचें नांव त्रिखंड गाजलें व ' गीतांजलि ' अनेक भाषांत भाषांतररूपाने प्रकट झाली. भारताच्या त्या अवनत काळांत, एका भारतीय व्यक्तीचा जगाने केलेला सन्मान व गौरव पाहून भारतीयांचीं मनें आनंदाने व अभिमानाने उचंबळून आलीं असलीं तर त्यांत आश्चर्य नाही. सुविद्य, सुसंपन्न व कुलीन घराण्यांत जन्म, शिक्षणाचे संस्कार विलायतेंत झालेले, आंग्लभाषेंत लिहिण्याचा स्पृहणीय सराईतपणा आणि विद्वज्जनांतील इंग्रजीची प्रतिष्ठा इत्यादि मोहमयी वातावरण भोंवतीं असून देखील, या महाकवीने मातृभाषेची वंगसाहित्याची-सेवा श्रद्धेने, निष्ठेने व भक्तिभावाने करून, साहित्याच्या अनेक लेण्यांनी तिला सजवून थोर पदवीला चढविलें हा रवींद्रांचा एक महनीय विशेष होय. विश्वभारती आणि शांतिनिकेतन हीं त्यांच्या विश्वव्यापी प्रतिभेचीं जिवंत प्रतीकें होत.

या ' जयंती'च्या प्रसंगाने एक कल्पना मात्र मनांत आल्यावाचून राहात नाही. या महाकवीचें वाङ्मय अजून अगदी गरीब वाचकापर्यंत पोचण्याची सोय झालेली नाही. इंग्रजी पुस्तकें अत्यंत महाग. हौसेने एखादें काव्य, कादंबरी अथवा गोष्टी विकत घ्याव्या म्हणून मनांत आलें, तर ग्रंथांच्या जबर किंमतीमुळे हा विचार तसाच विलीन होतो. वाचक जितके अधिक त्या मानाने रवींद्रांच्या साहित्यसंपदेचें मूल्यमापनहि यथायोग्य होईल, यासाठी मराठी साहित्यिकांनी रवींद्रांचें वाङ्मय अल्प किंमतींत मराठी वाचकापर्यंत आणून पोचविलें तर वाचकांवर त्यांचे अत्यंत उपकार होतील. येवढा महाकवि, पण त्याच्या साहित्याच्या आस्वादाची सोय फारच थोडी. पुढल्या वर्षाची जयंती अशा प्रकारच्या कांही ग्रंथांनी साजरी होईल, तर वाचक धन्यवाद देतील.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लघुनिबंध

‘ दिव्यं देहि मे चक्षुः ’

गो. रा. दोडके

बराच काळपावेतों माझ्या संग्रहांत एक पुस्तक होतं. तें हिंदुस्थानच्या इतिहासाचं होतं. इंग्रजी, इंग्रज लेखकानं लिहिलेलं, मागल्या शतकांत प्रसिद्ध झालेलं. त्या पुस्तकांत वैदिक जीवनापासून तर लॉर्ड हार्डिंजच्या कारकीर्दीपर्यंतचा इतिहास होता. त्यांत पहिल्या शीख युद्धाचं वर्णन होतं. पण पांचसात वर्षांच्या आंत घडून आलेल्या डलहौसीच्या कारकीर्दीतील दुसऱ्या शीख युद्धाचं वर्णन नव्हतं. डलहौसीची कारकीर्दच नव्हती. या पुस्तकांत कांही चित्रंहि होतीं, महत्त्वाच्या स्थळांची. ताजमहालचं होतं. त्या चित्राखालीं लिहिलं होतं ‘ आपली प्रियतमा नूरजहाँ हिच्या स्मरणार्थ शहाजहानने बांधला.’ माझ्याजवळ निरनिराळ्या लेखकांनी लिहिलेलीं हिंदुस्थानच्या इतिहासाचीं कितीतरी पुस्तकं आहेत, अगदी आजतागायतच्या इतिहासाचीं आहेत, सरस लिहिलीं आहेत. तसा मला, या पुस्तकाचा कांहीच उपयोग नव्हता. आणि तरीहि तें पुस्तक मी जपून ठेवलं होतं.

ताजमहालच्या चित्राखाली चुकीचा मजकूर लिहून लेखकानं जें अज्ञान प्रकट केलं होतं, तें मला मोठं मोलाचं वाटायचं कांही वर्षांपूर्वीचा काळ असा होता की एखाद्याचा तेजोभंग करावयाचा असला की इंग्रजांचं उदाहरण देऊन तो केला जाई. आमच्यांतला आळस, कर्तृत्वहीनता, मागासलेपणा, स्वत्वाचा अभाव, राष्ट्राचं नांव कलंकित होत असतांना देखील थोड्याशा फायद्याकरितां मॅंगनिजमध्ये माती कालवायची, चहामध्यें पालापाचोळा मिसळायची वृत्ति यांपैकी कोणत्याहि बाबतींत पाणउतारा करायचा झाला तर, “ ते इंग्रज बघा, नाहीतर तुम्ही ” या ध्रुपदानं केला जाई. प्रकार अशांतलाच होता. कांही आईबापांना घाणेरडी सवय असते. दुसऱ्यांचीं मुलं घरीं आलीं की स्वतःच्या मुलाला सारखे टोमणे दिले जातात. “ तो बघ कसा खेळतो, नाहीतर तूं !” “ तो बघ कसा निमूट बसला आहे, नाहीतर तूं ! ” “ ती बघ कशी रडत नाहीं, नाहीतर तूं ! ” “ तो बघ कसा आपल्या आईला काम करूं देतो, नाहीतर तूं ! ” या आईबापांसारखीच आमच्यांतल्या वडीलधाऱ्यांची बोलणूक होती. या लोकांच्या तोंडावर इंग्रजांमधलीं वैगुण्यं फेंकतां यावीं म्हणून मी एक कोशच तयार केला होता. मी म्हणायचा, “ इंग्रजहि एखाद्या गोष्टीविषयीं पुरेशी, सत्य माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत नाहीत. ‘ दडपून देतो ऐसाजें ’ हा प्रकार करतात. आमच्यासमोर तरी इंग्रजांना वानूं नका. ते काय आहेत, चांगलं कळतं आम्हाला. हा बघा इंग्रज इतिहासकारानं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लिहिलेला इतिहास. आणि त्यांने तुम्ही स्तुतिपाठक, त्यांचा हा गाढवपणा." अशा प्रकारें वरील प्रवृत्ति असणारांना तोंड देण्याकरिता, खोडून काढण्याकरिता, त्यांचा पाणउतारा करण्याकरिता एक महत्वाचा पुरावा म्हणून मला या पुस्तकाचं महत्व वाटत होतं. पण हें माझं अमोघ अस्त्र कोणत्या इंद्रानं, कोणत्या मिषानं, केव्हा पळवून नेलं, मला आठवत नाही. आज तें पुस्तक माझ्याजवळ नाहीं. आज पूर्वीसारखा मला त्याचा उपयोग नाही. कारण आपल्या लोकांची, राष्ट्राला खाली पहावं लागेल, त्याचं अनहित होईल अशा प्रकारची वृत्ति, वागणूक पाहिली की केवळ इंग्रजच काय, पण दुनियेंतील अगदी लहानलहानशा राष्ट्रांतील लोकांकडे बोट दाखवून "बघा ते राष्ट्राकरिता काय करताहेत, आणि तुम्ही काय करताहांत?" असं पदोपदीं म्हणावंसं वाटतं.

या पुस्तकाचं महत्व मला आणखी एका कारणानं वाटायचं, हिंदुस्थानचा त्यांत आलेला इतिहास १८४९ पावेतोंचा. इतिहासकाराचं नांव मला आठवत नाही. कुणीतरी लहानसाच असावा बिचारा. त्याच्या जीवनाविषयी मला कांहीच माहिती नाही. मनांत विचार येतो कदाचित् यानं डलहौसीची कारकीर्द पाहिली असेल. कदाचित् १८५७ चं स्वातंत्र्ययुद्धहि पाहिलं असेल. पण आपल्याला आज जो भारताचा इतिहास अवगत आहे. ज्याचा कांही भाग प्रत्यक्ष आपल्या डोळ्यासमोर घडला आहे तो कांहीं या इतिहासकाराला बघायला मिळाला नाही. १८४९ आणि १९५२! भारताच्या जीवनांतील केवढं मोठें एक पर्वच्यापर्व उलटून गेलं! डलहौसीची कारकीर्द! भारतभूमीच्या पटावरील सगळ्या नरदा मारल्या गेल्या आणि इंग्रज सार्वभौम झाला! १८५७ चं बंड! नागवले गेले, त्यांनी झुंज घेण्याचा यत्न केला. पण अनेक कारणांनीं तडफड अयशस्वी झाली. हिंदुस्थानच्या चतुःसीमेंत शस्त्रास्त्रांचा खणखणाट थांबला. यापुढचा कांही काळ, म्हणजे एखादं गणित चुकल्यावर, वेगळ्या रीतीनं, नीटपणानं सोडवायला घ्यावं अशांतला. नवीन, अहेतुक संस्कारांनी नवीन मन निर्माण झालं, त्या मनांत नवीन आशा आकांक्षा जीव धरूं लागल्या. एका निश्चित दिशेनं, निश्चित ध्येयानं हिंदुस्थान पावलं टाकूं लागला. कॉंग्रेस अस्तित्वांत येऊन तिचं रोपटं जोम धरूं लागलें. लवकरच तें रोपटं फोफावलं, त्याचा वृक्ष झाला, अक्षयवटाप्रमाणे त्यानं भारत व्यापलं. अत्याचारांना तोंड देतांदेतां प्रतिकाराची शक्ति वाढत गेली राष्ट्र बलशाली झालं. लोकमान्यांनी स्वराज्याचा मंत्र दिला. महात्माजींनी नवीन ध्येयं, नवीन कार्यक्रम, नवीन मार्ग राष्ट्राला दिले आणि अनेक पुण्यात्म्यांच्या पुण्याईचा परिणाम म्हणून भारत स्वतंत्र झाला.

हा सगळा इतिहास १८४८ ते १९५२ पावेतोंच्या काळांतला. ज्या इतिहासाच्या पुस्तकाविषयी मी लिहितों आहे, त्याच्या लेखकानं यांतलं कांही एक पाहिलेलं नसेल कारण आपल्या दृष्टीनं हा सगळा इति + ह + आस असला तरी त्या लेखकाच्या दृष्टीनं ह्या सगळ्या भविष्यकालीन घटना होत, आणि भविष्यकालीन घटना प्रत्यक्षपणें बघतां येतील, किंवा शरीराचा विनाश झाल्यावर देखील बघूं शकतील, सुखदुःख भोगूं शकतील अशा प्रकारचे डोळे आजवर माणसाला लाभले नाहीत. त्यामुळे प्रस्तुत इतिहासकाराला भारताच्या बाबतींत काय बघता आलं नाही हें आपण पाहिलं. पण याच काळांत जगताच्या रंगभूमीवर केवढाल्या घडामोडी होऊन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राहिल्या होत्या, त्याहि त्यानं पाहिल्या नाहीत. क्रिमियाच्या लढाईची वार्ता कदाचित् त्यानं ऐकली असेल, आगगाडींतून लहानसा प्रवासहि केला असेल, परंतु बिस्मार्कनं जर्मनीचं एकीकरण करण्याकरिता, जर्मन राष्ट्र निर्माण करण्याकरितां खोटी तार स्वतःच पाठवून, जर्मनीमध्यें फ्रान्स विरोधी वातावरण उत्पन्न करून फ्रँको जर्मन युद्धाला आवश्यक असलेली भूमिका निर्माण करण्याचं जें कार्य केलं, त्याची त्याला गंधवार्ताहि नसेल. पोर्ट आर्थरचा वेढा आणि हिरोशिमावरील अणुबॉंब हा त्यानं पाहिला नाही. कायसरचा उद्दामपणा आणि जर्मनीतून पलायन हेंहि त्याला अदृश्यच. हिटलरच्या वाढत्या यशाचा काळ आणि शेवटीं अज्ञात अंत हाहि त्याला अविदितच. इंग्लंडच्या साम्राज्याचा विकास आणि नंतर संकोच हाहि इतिहास त्याला अपरिचित. लेनिन आणि त्याचं विश्वव्यापी कार्य त्याला माहित नाही आणि म्हणूनच वाटतं, शरीर नाहीसं झाल्यावरहि बघूं शकतील अशा प्रकारचे डोळे आपल्याला मिळावे. आकाशाकडे पाहून पुष्कळदा माझ्या मुखांतून, विश्वनियंत्याला उद्देशून प्रार्थना निघून जाते.

‘ दिव्यं देहि मे चक्षुः ’

भविष्यकाळांतील जीवनाविषयी मनुष्याला नेहमीच कुतूहल वाटत आलं आहे. ज्या काळांत मनुष्य जीवन जगतो तो त्याला समाधानकारक वाटत नाही. आज भूतलावरील जीवनाचं स्वरूप हेंच आहे त्यांत उणीव आहे. आजच्या काळांत होत असलेल्या घडामोडी एवढ्या प्रचंड आहेत की त्यांचा जीवनावर परिणाम कसा होणार याविषयींहि तो विचार करतो आहे. आल्डस हक्सले, जॉर्ज ऑर्वेल, यांनी उद्यांचं जीवन पाहण्याचा आणि दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. हिरोशिमावर पडलेल्या अणुबॉंबनं विचारवंत कलावंताच्या मनामध्यें जीं आंदोलनं निर्माण झालीं, त्यांचंच दृश्यस्वरूप म्हणजे Apes and Essence आणि Nineteen eightyfour अणुशक्तीच्या प्रयोगाबरोबरच हायड्रोजन, इतर वगैरेंवर प्रयोग चालले आहेत. नापाम बॉंब तयार झाला आहे. प्रचंड शक्ति आज माणसाच्या हातांत आहे. पण या शक्तीचा उपयोग कल्याणमय स्वरूपाचा होईल हा मनुष्याचा विश्वास मात्र मरून पडला आहे. अणुशक्ति मानवी जीवनाला पोषक होऊं शकते. पण जगांत ती अवतरली संहारक स्वरूपांत, लाखो लोकांचा जीव घेऊन अवतरली, अपरिमित संपत्तीचा व्यय करून अवतरली. नगरचं नगर बेचिराख करून तिनं आपल्या शक्तीची जगाला जाणीव करून दिली. देशोदेशींच्या सरकारांचं स्वरूपहि माणसाला कळून आलं. युद्धकालीं जीवनविध्वंसक साधनं निर्माण करण्याकरिता, युद्ध चालू ठेवण्याकरितां जीं सरकारं कोट्यावधी पौंडांचा, डॉलरांचा, रुपयांचा चुराडा करतात. तींच शांततेच्या काळांत सर्वसामान्य मनुष्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीनं कांहीच करत नाहीत. उपासमार होईल, वाढेल याच प्रकारचे प्रयत्न चाललेले असतात, सरकारची वागणूक लोकांच्या डोळ्यावर येऊं नये म्हणून वैमनस्यांचं बीज पेरून त्याची पद्धतशीरपणें वाढ केली जाते. हिटलरनं निर्माण केलेला ज्यूद्वेश आणि दुसरं महायुद्ध यांच्यामागे हीच भूमिका आहे. ही परिस्थिति असल्यामुळे मानवाच्या हस्तगत होणाऱ्या शक्तीच्या कल्याणकारकतेवर आज जगाचा विश्वास उरला नाही. हिरोशिमावर बॉंब पडला असतां तेथील सजीव प्राण्यांवर, निर्जीव वस्तूंवर झालेला परिणाम ध्यानांत घेऊन हक्सलेची सृष्टि सिद्ध झाली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आजच्या जीवनांत मनुष्याला मनुष्य या नात्यानं स्वतंत्र अस्तित्व नाही. तो एका मोठ्या यंत्रांतलं, एक लहानसं अवजार आहे. त्याला स्वतंत्रपेन नाही, सुखदुःख नाही, जीवन नाही, विशिष्ट रीतीनंच त्यानं वागलं पाहिजे, विशिष्ट प्रकारचेच विचार त्यांच्या मनांत आले पाहिजे, अपेक्षिलं जाईल तें काम त्यानं बिनबोभाट केलं पाहिजे. यंत्राला तेलपाणी लागतं, पण ही यंत्राची गरज नव्हे. मालकाची गरज म्हणून तेलपाणी दिलं जाईल, माणसाला पोटाला मिळेल, गरजा भागवल्या जातील, कांही ठिकाणीं या व्यवस्थेमागं मालक नसेल, सरकार असेल, पण परिस्थिति मात्र तीच. मनुष्य आपल्या मनांत विचार करूं म्हणेल, चाकोरीबाहेर राहूं म्हणेल, तर त्याला समाजांत जगण्याचा अधिकार नाही, मृत्यूचंच द्वार त्याला मोकळं. या प्रवृत्तीवर उभारलं गेलेलं जीवन ऑरवेलच्या कादंबरींत.

ही तर या दोघा कादंबरीकारांची सृष्टि झाली. मला या प्रवृत्तींवर उभारलं गेलेलं जीवन प्रत्यक्ष बघावंसं वाटतं, म्हणूनच सृष्टिनिर्मात्याला प्रार्थना 'दिव्यं देहि मे चक्षुः' अजर, अमर असे जर चक्षु मिळाले तर कल्पांतापावेतोंचा, नव्हे त्यानंतरचाहि मानवी जीवनाचा, सृष्टिविलयाचा, नवसृष्टीच्या जन्माचा सगळा देखावा मला पाहतां येईल.

कुणाची कल्पना असेल, या प्रकारचे डोळे कधी कुणाला मिळाले नाहीत, मिळायचे नाहीत. पण पुराण आणि इतिहासाचा दाखला वेगळा आहे. स्थलांतरावर मात करणारे डोळे संजयाला लाभले होते. आणि काळावर मात करणारे डोळे महमद गझनवीला मिळाले होते बसल्या ठिकाणाहून संजयाला विश्वदर्शन घडत होतं, तर शरीराचा मृत्यु झाल्यानंतरहि महंमदाचे डोळे गझनवीमधून फेरफटका करीत होते, आपणच निर्माण केलेल्या गझनवीच्या वैभवाचं, सौंदर्याचं दर्शन घेत होते. स्थलांतरावर मात करणाऱ्या संजयाचे डोळे शरिराश्रयी होते. पण महंमदाचे काळावर मात करणारे डोळे अशरिरी होते. या प्रकारचे डोळे मला लाभले तर ॲटम बॉंबचा स्फोट होत असतांना त्याच्या लोळांत उभं राहून कौतुकानं मी त्याची करणी बघूं शकेन, गौरीशंकरांचं अजिंक्यपत्र मी हिरावून घेऊं शकेन, जागतिक महायुद्धाच्या धुमश्चक्रींत शिरून मी ती बघूं शकेन, किंवा व्हाईट हॉल, क्रेमलिन, डॉनिंग स्ट्रीट, दिल्ली येथे जगाच्या भवितव्यासंबंधी चाललेली खलबतं मी ऐकूं शकेन, अमेरिकेने कोरियांतील युद्धांत जंतु बॉंबचा उपयोग केला की नाही या प्रश्नासारख्या प्रश्नांची उत्तरं मजजवळ तर अगदी तयार असतील.

पण याहि डोळ्यांचं दुःख मला माहीत आहे. भवभूतीनं मला या दुःखाची जाणीव करून दिली आहे.

लक्ष्मणानं सीतेला अरण्यांत नेऊन सोडल्याला बारा वर्षांवर काळ लोटला होता. शंबुकाचा वध करण्याकरिता राम जनस्थानांत आला होता. कैकयी मातेचा प्रसाद म्हणून लाभलेल्या अरण्यवासाचा कांही काळ राम लक्ष्मण आणि सीतेनं या जनस्थानांत पूर्वी काढला होता. राम आल्यावर पूर्वीच्या सहजीवनांतील प्रसंगांची आठवण देणारीं दृश्यं, स्थळं पाहील आणि आजच्या वियोगावस्थेंत अत्यंत दुःखी होईल. म्हणून त्याच्या दुःखाचं हरण करण्याकरिता सीताहि जनस्थानांत, भागीरथीच्या सांगण्यावरून आली होती. भवभूतीला छायाअंकाच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

योगानं रामसीतेचं मनोमीलन घडवून आणायचं होतं, मनामध्ये असलेले किंतु नाहीसे करायचे होते.

भगवती भागीरथीनं "पतीसमीपवर्ती अदृश्य रूपानं तुला राहतां येईल" असा वर तिला दिला होता. पूर्वजीवनांतील सुखदुःखांची स्मृति रामाला व्हायची. हृदयांत दुःखाचा कल्लोळ व्हायचा, त्याला मूर्च्छा यायची, मग सीता त्याला हस्तस्पर्श करून चेतना द्यायची 'तूं जीव, तूं हृदय, तूं मजला विसावा, तूं चंद्रिकाच नयना शरिरा सुधा वा'—अशा सीतेचा हा स्पर्श ही जाणीव रामाला व्हायची, जवळपास ती असेल म्हणून तो बघायचा, ती दिसायची नाही. मग सगळा भास मानून तो अधिकच दुःखी व्हायचा, त्याच्या दुःखानं सीता दुःखी व्हायची. सीतेला राम दिसायचा, त्याचं दुःख दिसायचं, वासंती मधून मधून रामाला टोंचून बोलायची, सीतेला तिचा प्रतिकार करावासा वाटायचा परंतु राम आणि वासंती यांच्या दृष्टीनं ती आसमंतांत, अगदी समोर, नव्हतीच.. सीता अशरिरी झाल्यामुळे तिला कांहीच करतां येईना. वासंतीला सांगतां येईना. "असं कांही बोलूं नकोस, बाई," रामाला सांगतां येईना, "बघरे, मी तुझ्या सन्निध आहे," नुसते डोळे असलेल्या सीतेची, व्यक्तिची ही तगमग आहे. भवभूतानं रसराज करुणाचा प्रकर्ष दाखवण्याकरिता नुसते डोळे असलेली सीता निर्माण केली आहे. बघाना, दीर्घ वियोगानंतर पतिदर्शन झालेलं. पण बोलायला मिळालं नाही. रघुकुलाची कीर्ति उज्ज्वल करतील असे पुत्र तिला झालेले, पण रामाला हें तिला कळवतां आलं नाही. रामाच्या दुःखाला आपणच कारणीभूत होऊन, त्याच्या दुःखाचं निराकरण करतां आलं नाही, तें दुःख नुसतं बघावं लागलं, आणि आपल्या आपल्याशींच व्यथित व्हावं लागलं. शरिराश्रित नसलेल्या डोळ्यांचं हें भाग्य आणि हेच डोळे मला लाभावे ही मला आशा आणि कशाला म्हणाल, तर पंचमहाभूतांनीं शरीराचा आपआपला अंश काढून घेतल्यावरहि माझे डोळे रहावे म्हणून, कल्पांतावर जगांत काय काय घडलं जातं हें पाहत राहण्याकरिता.

संपूर्ण विश्व कधीकाळीं सुखी होईल असा विश्वास माणसानं धरणं हा एक वंचनेचा प्रकार आहे. माणसाचं मन आणि आणि माणसामाणसाचे संबंध असे नव्हत की जगांत, समृद्धीचं, शांततेचं, सुखाचं साम्राज्य नांदावं. वासना आणि भावना यांच्यामधून निर्माण होणारी अहमहमिका, अत्याचार, अहंकार, अमानुषता, अनृत यांचा एवढा प्रचंड यथयथाट सदाचा राहणार आहे की, आपण सुखी व्हावं असं वाटणारालाहि सुखी होता यायचं नाही. प्रत्येक युगाचं एक मनोराज्य असतं. त्याच्या साफल्याची आशा मनाशीं बाळगून मानवसमाज जीवनपथ आक्रमित असतो. हें मनोराज्य प्रत्यक्ष नांवारूपाला आणण्याकरितां तो आटोकाट प्रयत्न करतो. त्यांतील विफलता कळून आल्यावर नवीन मनोराज्य निर्माण होतं. ही सगळी क्रिया व्यक्तिगत जीवनाला तुच्छ मानणारी आहे, मग ही व्यक्ति बुद्ध, नेपोलियन लेनिन, हिटलर, गांधी, आयनस्टाईन—कुणीहि कां असेना ! हा सगळा खेळ चाललेला असतांना, तो बघत असतांना, नुसते डोळेच ज्या व्यक्तीला आहेत, ती पदोपदीं दुःखी होइल. डोळे जेव्हा शरीराश्रित असतात तेव्हा ते स्वतःच्याच सुखदुःखांत रमलेले असतात. शरीराचा आश्रय नसलेले डोळे दुसऱ्याचंच दुःख बघायला असतात. प्रामिथिअसचं दुःख कधीहि न संपणारं, त्याचप्रमाणें या डोळ्यांचं देखील.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या डोळ्यांना जगाच्या विध्वंसाची खलबतं चाललेली दिसतील, लक्षावधी लोकांच्या मुखांतील भाकरी ओढली जात असतांना दिसेल, सगळ्या जगाचा एका क्षणांत लोळागोळा करतां येईल या प्रकारच्या साधनांच्या शोधाचे प्रयत्न चाललेले दिसतील, पण जगाला या गोष्टींची जाणीव देतां यायची नाही. ज्या गर्तेत मनुष्य पडणार त्या गर्तेच्या दिशेनं पडणारी त्यांची पावलं वळवता यायची नाहीत. हें दुःख नाहीसं करणारं एकच साधन आहे, मृत्यु. पण हे डोळे मरायचेहि नाहीत. वाहत्या व्रणांचं दुःख शरीरावर घेऊन युगायुगांतून अश्वत्थामा जगतो आहेना! चिरंजीव आहे तो. चिरंजीव डोळे!

म्हणूनच वाटतं.

जें काय आयुष्य जीवंतिकेनं ललाटलिखित केलं असेल, आणि पांचवी पूजली जात असतांना सटवीनं जें कांहीं सुखदुःख भाग्यांत गुंफून ठेवलं असेल, तेवढं भोगून, तेवढं पाहूनच जीवनानिवृत्त होण्यांत शोभा आहे. त्याहून अधिक आशा करणं अतर्क्य अशीं अनंत यातनांना आवाहन करणं लाहे. अशरीरी होऊन सुखदुःख भोगण्यापेक्षा शरीरी राहून सुखदुःख भोगणं हें केव्हाहि सुखाचं इंद्रियगम्य सुखदुःख परिमित काळांच असतं. इंद्रियाविहीन दुःख! त्याचं स्वरूप कोण जाणतं! मग उगाच अशरीरी दृष्टीची आशा धराच कशाला! इच्छा करा कशाला!

विदर्भ साहित्य संघ

सभासद व प्रचारक यांना सूचना

'युगवाणी' चा अंक दर महिन्याच्या पहिल्या तारखेला प्रसिद्ध होईल.

दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत विदर्भ साहित्यसंघाचे जे सभासद होतील व ज्यांची केंद्रीय कार्यालयाच्या नोंदणीवहींत सभासद म्हणून नोंद होईल, अशाच सभासदांना 'युगवाणी' चा पुढील ताजा अंक पाठविण्यांत येईल. १० तारखेनंतर झालेल्या सभासदांना मात्र हा अंक मिळणार नाही. कारण १० तारखेपर्यंत जेवढे सभासद पटावर राहतील, तेवढेच अंक सोयीच्या दृष्टीने काढले जातील.

तसेंच, 'युगवाणी'च्या मोजक्याच प्रति काढल्या जाणार असल्याने मागील कोणताहि अंक सभासदांना पाठवितां येणार नाही. त्याबद्दल सभासदांनी क्षमा करावी.

प्रचारकांनी ही नम्र सूचना लक्षांत घेऊन, सभासदत्वाच्या कार्यालयीन पावत्यांसह दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी सभासदांची वार्षिक वर्गणी केन्द्रीय कार्यालयांत जमा करण्याची कृपा करावी व सहकार्य द्यावें, ही विनंती.

दि. १५-५-१९५२
केन्द्रीय कार्यालय,
उत्तर अंबाझरी रस्ता नागपूर १

ना. रा. शेंडे
सरचिटणीस,
वि. सा. संघ

आले दिन, गेले दिन !

आले दिन, गेले दिन !
आले पांखरांच्या परांनी,
गेले खारींच्या पावलांनी !
किति द्रुत, मृदुल, सुकुमार,
किति मधु, चपल, अनिवार !

चांफा, राणी, कुंद-माकंद, मोगरी
या सुगंधांच्या पंखांवर तरंगुनि,
फुलपक्ष्यांच्या रथीं जांभळ्या चढुनी,
किर्मिजी, रानवर्खी, लाल-शेंदरी
सांध्य जलदांच्या दुलईत पहुडलों !

मत्त मैफलींच्या झुळझुळित दुकुलीं,
लयकारीच्या गोड, वाहत्या अनिलीं,
मखमाली सरपटी श्रवत मीं
हृदयांचे नव पद्मगेंद झेलिले !

झिल्लिकांच्या 'किर्र' थरकत्या रात्रीं
चंद्रिकेची जाळी हलती मायावी बघतां,
आणि रानचे शीतल, ओले गंध हुंगितां,
कोटरांतल्या कुशींत लाडिक
पांखरांची सान संगत पाहिली !

कुसुममयी हसत्या पऱ्या !
जलमहालीं तरल त्यांचिया
निद्राळू, हलक्या अंगाई-लहरींनी
स्वप्नतरंगीं रंगरंगलों !

अष्टमीच्या हळव्या, कोमल रात्रीं
यमुनातीरीं तृणपात्यांच्या अग्राग्रांवरि
इंद्रधनूंच्या रंगमंदिरीं
दवाश्रु वनदेवींचे हेमतीं
ढळते दिसती,
नकळे कोठुनि,
तैसे आले दिन ते, कमले !

—अन् अळित्याच्या निजतळव्यांनी
रवि पुसतो मृदु कुरणांवरुनी
अश्रु, कुठे ते नकळे जाती,
गेले दिन, गेले अबोध तैसे गोगलपायांनी !
—आणि आले आता उदास, धूसर गगनाचे !
—अबोल, धूसर गगनाचे !

उदासतेच्या या उदधीमधिं
अनंत कालघनाची अमाप वृष्टी टपटप,
आर ना पार,
गाध ना अगाध,
त्या एका कातळद्वीपीं
लाटा गणतां विरत्या क्षितिजाच्या वलयीं
तुझी प्रतीक्षा, तुझी प्रतीक्षा !

—अरविंद मंगरूळकर

सफलता शून्य या, भरुनि जा जीवनीं

आज आठव तुझा अधिरवी जीव हा
केंवि समजेल तो सार्थ स्पर्शाविना
सघन अविराम मम सदन हे राहिना.

गुंगुनी जीवनीं अमितशा नर्तनीं
नाच मी नाचलों धुंदशा गायनीं
अमित शक्तीसवें जीवनीं अतुल मी
दुःख सौख्यांचिया नर्तलों गतिंतुनी

आज उन्माद तो दूर जाता अता
शून्य झाली अशी रंगभूमी अता
मौन एकांतिच्या विकलतम या क्षणीं
आठवण आज तव लहरतें ही मनीं

मृदुल वीणा अता अधिर स्पर्शाकुला
जाहली वाजवी येई झणि स्पर्शना
वाजवी मंद्र गंभीरशी रागिणी
सफलता शून्य या भरुनि जा जीवनी

—वसंत माधव

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पोरकें रे ! मन

जंजाळांत इथल्या ह्या
तुझें पोरकें रे ! मन
हसेल का कुणाच्याह्या
ओठीं हास्यास पाहुनि ?
झळ लागून उन्हाची
कळी कोवळी सुकतां
रसरसेल का पुन्हा
पाणी वरचें घालतां ?
रस खोलांत आटतां
कशी पालवी फुटावी

काय करेल वसंत ?
आस कोणती जगावी ?
मूक दुःखास फुटेना
शब्द कोरड्या दयेने
गहिवरेल का गळा
औपचारिक स्पर्शाने ?
सावलीच्या शोधासाठी
जगें कासावीस प्राण
जंजाळांत इथल्या ह्या
तुझें पोरकें रे ! मन

—गुणाकर देशपांडे

आवाजाला नाही साथ

आवाजाला नाही साथ
नाही प्रतिध्वनि जेथे !
अंधारांत नाही वात
काळ्या सांवल्याच जेथे !

बने नातेंच बंधन
भावनेला रूप हवें
नको निशब्द स्पंदन
हवे शब्द नवे नवे !

जग धुकें, मन धुळें
कोठे, काय, कोण चुके ?
वाट धरून चालवी—
आपुलें नशीब मुकें !

वासना मानून सत्य
काळ्या छाया आलिंगितों !
विवेकाचें नांवावर
कोता स्वार्थच पूजितों !

अर्थवाही शब्द झाला—
आज अर्थाचा न दास
रूपालाच धूप जेथे
कोण पुसे आशयास ?

शकलें जोडून जरी—
उभे राहूं आहों ताठ !
आंत आंत कोठे तरी
दुखत राहते गांठ !

आवाजाला नाही साथ......

—मनोहर म. देशपांडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शिल्पा–शिल्पावर

शिल्पा–शिल्पावर आज आर्ततेची दिसे कथा
शिल्पा–शिल्पावर आज ओसंडते मनोव्यथा
व्यथांचिया चरकांत जीव जातसे पीळला
भावनेच्या रक्तामाजी देह माझा झाला ओला!
माघांतील, पौषांतील थरथरणारी रात
रात्रीं बाराचा सुमार, रस्ता जाहला निवांत
अवखळ दिवसाची खळखळ रहदारी
पूर्णपणें झाली स्तब्ध; लोक झोपलेत घरीं...
खिन्न पुलाची ती चर्या, खिन्न खालचा तो रस्ता
खिन्न लोखंडी कमान, खिन्न सारे सारे आता
साऱ्यांवर पडे दाट पांघरूण अंधाराचें
अंधाराच्या रोमरोमीं कडाक्याची थंडी नाचे...
पाणीहि गोठावें अशी कणांकणांमाजी थंडी
वारा गाई कुठलीशी जीर्ण विषण्णशीं गाणीं
अंधार हा ओथंबला, थंडी–जल ओघळतें
आणि वाऱ्यासंगें थंडी, जीव घ्यावया सजते!
वीस–पंचवीस कोणी, माणसें तीं म्हणवितीं
मुटकुळें हाडांचीच करूनिया पहुडती
खालीं धूळ, वर हाडें, वर जीर्ण पांघरुण
झोपलेत नरदेहजणूं प्रेतांच्या समान!
दिवसाचे श्रम त्यांचे, फक्त भीक मागण्याचे
नि शिजवायचें अन्न, त्याच ठिकाणीं खायचें
अंवतीं धूळ, भंवतीं धूळ, अन्नामाजी धूळ, धूळ
देहावर धूळ आणि देहा आंत धूळ, धूळ!
लक्तराच्या पांघरूणें थांबे थंडीचा कडाका!
लक्तरांच्या पांघरूणें त्यांना उब येईल का!
शिणलेले याचक ते, अर्धपोटीं, निर्वासित
व्याधिग्रस्त झोपलेत थंडींत कुड्कुडत!
लहानशी मधें कोठे, धूर ओकते आगटी
तिच्या उबेवर जीव शांततेनें झोप घेती
दिवसाचें थकलेलें कोठलेसें कुतरडें
आगटींत घाली पाय, मधे खिन्नतेनें रडे!

रात्रीं बाराचा सुमार, सारें शांत हो प्रशांत
गंभीरता, विषण्णता प्रसवते थंड रात
रस्त्यावरील दीपक ओती मंदशीं किरणें
अवचित् पंख कोण्या पांखरें फडफडणें...
होई असह्य ती थंडी! मानवाची सरे शक्ति
निसर्गाच्या शरांपुढे झरे जीवन–आसक्ति!
कैंकाटून उठे मधे लहानगे भिकाऱ्याचें
थंडी त्याच्या अंगामध्ये ज्वरासंगें स्वैर नाचे!
एक झांकोळता दीप काय उजळे दुसऱ्या
क्षीण उपाशी आई ती, काय देई लहानग्या!
छातीचिया पिंजऱ्यांत, तडफड जीवनाची
रोंवतसे मृत्यू पाय, फडफड त्या प्राणांची...
ताणी हातपाय पोर, शेवटले आंचके दे
फडाडून पंख छोटे प्राणपांखरूं तें उडे
थकलेली आई घेई उबेसाठी कुशीमध्ये
पोर तिचें! माया खेळे साऱ्यांसाठी जगामध्ये!
माघांमध्ये, पौषामधे कितीतरी पुलांखाली
अशी सांपडतीं प्रेतें मानवाचीं गोठलेलीं
आकाशाच्या उजळत्या तेजोगर्भ मुखासंगे
लोक पाहतात त्यांच्या बांधवांची अशीं अंगें।
माझे विचार–तुषार स्तब्ध झाले उडतांना
माझा उल्हास, उमाळा गोठलासे पाहतांना
जल गोठे, हिम होई, टाकी फोडोनी खडक
गोठलेल्या भावना 'ती' कधीं देतील 'धडक'!
मानवाच्या जीवनाचीं कोरलेलीं लेणीं मोठीं,
सौख्य, हर्ष, त्यागानंद, क्षमा, दान, हास्य, धृति
प्रीति, माया, शौर्य, कार्य, सारीं शिल्पें त्यालेणींचीं
साक्ष देती मानवाच्या स्नेहपूर्ण जीवनाची!
शिल्पा–शिल्पावर मात्र आज आर्ततेची कथा
शिल्पा–शिल्पावर आज ओसंडते मनोव्यथा
चरकांत व्यथांचिया माझा जीव पीळलेला
भावनेच्या रक्तामाजी देह जाहलेला ओला!

—वसंत मोहरील.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

* अर्धांगता ही गूढ प्रीतीची

गिरीराजीच्या शिखरावरतीं
लाल लाल अंगार भडकला
धूसर सगळी सृष्टी उजळली;
दाहक जळत्या शुष्क वाळूच्या
उष्ण धडकत्या निश्वासांनी
दिवसभरीच्या आकांक्षांचें
गढूळ पाणी निर्मळ होई.
आकाशाच्या दर्यामधुनी
शुभ्र चंद्रमा नाव वल्हवी
रात्रीच्या काळोखा देई
तरल रुप्याची गोड झिलाई
तव नेत्रांचें तेज पाहतों
आतां नलगे प्रकाश दुसरा.
या दिवसाने ठार मारल्या
पुष्पांचें प्राणांतिक क्रंदन
हळूच झिरपते, हळूच पसरते
वस्त्रांतून सायंतेजाच्या
आणि दरवळे त्याच सुवासें
अफाट हें मैदान मोकळें.
प्राण ओतूनी गात्रांमध्ये
धरूं पाहतों गंध मधुर तो
व्यर्थ परी तें, सुगंध मादक
तव केसांचा हातीं येतो.
अनंत हें मैदान मोकळें
विस्ताराचें उमटे हृद्गत
अनंत हें आकाश पसरलें
डोक्यावरती थेट शिगेवर
परी तुझ्या वक्षांत बांधल्या
मना त भावे अर्धांगता ही
गूढ प्रीतीची तुझिया केवळ

—दि. वा फडणवीस

विरूनी सरावें वाटतें

जें चारू तें तें पाहुनी हुर्हूर मानसिं दाटते
जडता जिवाला जाचते, मन उन्मळूं हें पाहतें
कांहीं सुचेना जीवनीं; ना गोड कांही लागतें
अतनु व्हावें नी विरावें त्यांत ऐसें वाटतें

तोच तोची जीवनक्रम, तीच ती संकीर्णता
पाखरूं बेफाम माझें जागतें, किंचाळतें
देई धडक्या पिंजऱ्याला मोकळें नभ पाहुनी
अनुभवूनी दिव्यता ती पंख अपुलें झाडतें

ये अहाहा ! सांज ती पसरे धुकें संदिग्धसें
मंजूळ स्वरिं कोण तींतुन हाक मजला मारतें
मी बोलतांची बोलतां विसरे वदे मी काय तें
नी रोजचें जग पाहुनी मन विस्मयें भांबावतें

मूक विरते सांज अंधुक शांत आरस्पान डोहीं
तेवि सुंदरते मधी विरूनी सरावें वाटतें

—शरच्चंद्र मुक्तिबोध

* एका इंग्रजी कवितेवर आधारीत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लघुनिबंध

गा लि प्र दा न स्तो त्र

शां ता रा म

लहानपणीं मी बराच चावट होतों; मला वाटतं अजूनहि मी थोडा फार चावट आहेच. मी जसा चावट आहे तसाच आणखीहि कांही आहे. तसा मी लहरींत असलों तर चावटपणासारख्या माझ्या इतर अनेक गुणांसंबंधी मी बोलूं शकतों. या वेळींहि मी तसाच लहरींत आहे पण मला बोलायचं आहे तें माझ्या या संशयित गुणांबद्दल नव्हे. मुख्यतः मला एका गंमतीचा विचार करायचा आहे. ती गंमत अशी की ज्यांना गुण म्हणत नाहीत अशा माझ्या गुणांचा उल्लेख मी स्वतः केला तर मी आनंदांत असतों; तोच उल्लेख इतर कुणी केला तर मात्र मी चिडतों. स्वतःला शिव्या देण्याची लहर मला कधी कधी येते व ती लहर पुरवतांना मी मोठा खूष असतों. त्याच शिव्या इतरांनी मला दिल्या—पुष्कळ पाणी घालून दिल्या तरीहि—मी चिडतों. शिव्या त्याच; पण त्या इतरांच्या तोंडून ऐकतांच मला राग कां यावा ? असा राग मलाच येतो असं नव्हे माझ्यासारखा राग येणारे लोक मला पुष्कळ भेटले आहेत.

माझ्या ओळखीचे एक वृद्ध खानसाहेब होते. काबूलहून इकडे येऊन त्यांनी आपल्या कर्जाचं जाळं ग्रामच्या गावांत खूप पसरवलं होतं. ते नेहमी म्हणत, "मी तर लवकरच जाणार. खुदाच्या बोलावण्याची नुसती वाट आहे की मी हा असा निघालों." त्यांची प्रकृति चांगली असूनहि देवाघरीं जाण्याची भाषा ते वाटेल त्या संदर्भात बोलत असत. आपल्या काबूलच्या द्राक्षांची, गुलाबी कांतीची, बहादूर जवानांची ते तारीफ करूं लागले की साहजिकच कुणीहि त्यांना विचारी, "खानसाहेब तुम्ही कधी जाणार देशांत ?" त्यांचं उत्तर ठरलेलं "मी तर खुदाकडे जाणार." त्या "जाणार" या घोषणेबरोबर ते काबूलचं वर्णन सोडून स्वर्गाचं वर्णन करूं लागत. 'जाणं' या शब्दाला त्यांच्याजवळ एकच अर्थ होता आणि तो म्हणजे 'कायमचं जाणं.' त्यांच्या बोलण्याचा एकंदर रोख असा असायचा की त्यांना आता पृथ्वीवर गंमत वाटत नाही आणि जी कांही मौज आहे ती फक्त स्वर्गात. एकदा त्यांच्या कानावर अशी बातमी आली की त्यांच्या बरोबरीचे दुसरे एक खानसाहेब पैगंबरवासी झाले. त्या बातमीमुळे दुःखी व्हायचं सोडून खानसाहेब म्हणूं लागले, "वाघलं, माझ्या अगोदर तो गेला. छे, छे, आपण मागे राहून चालणार नाहीं. मला आता लवकर लवकर गेलं पाहिजे." त्यांची ती स्वर्गाची ओढ पाहून मी तर थक्क झालों. पण त्यांचा जिवा ने उल्लेख करीत असल्यामुळे मी त्यांच्या

बोलण्यावर विश्वास ठेवला व एक दिवस त्यांना म्हणालों, "खानसाहेब मग केव्हा जातां आपण ?" माझ्या त्या प्रश्नासरशी खानसाहेब अनपेक्षितपणे माझ्यावर चिडले आणि बोलले, "माझ्या अगोदर तूं जाशील, तूं; समजलास !" ते शब्द उच्चारतांना झालेली त्यांची कावरी बावरी मुद्रा मी कधींहि विसरणं शक्य नाही.

असाच अनुभव माझ्या एका मित्रानंहि दिला. आमचा हा मित्र आमच्यापेक्षा कमी शिकलेला, तात्त्विक प्रश्नांचा गुंतावळा उकलण्यांत असमर्थ, आमच्यापेक्षा गरीब पण स्वभावानं अधिक निर्मळ आणि जिव्हाळ्याचा होता. आम्हा मित्रमंडळींत एखाद्या राजकीय वा वाङ्मयीन प्रश्नाची चर्चा सुरू झाली की आमचा हा मित्र चूपचाप बसायचा. आमच्यापैकी कुणी त्याला बोलायचा आग्रह केला तरी तो म्हणायचा, "तात्त्विक चर्चा खरोखरच मला कळत नाही—तुमची मैफल मला आवडते. हे विषय मात्र माझ्या डोक्यांत शिरत नाहीत" असं तो इतकं वारंवार म्हणायचा की एकदा माझ्या हातांतील एक ग्रंथराज त्यानं मागितला असतां माझ्या तोंडून शब्द निघाले, "दोस्त, हें पुस्तक मलाच समजलं नाही. अतिशय बिकट काम आहे. तुला तर तें मुळींच जमायचं नाही." माझ्या त्या उद्गारांचा त्याला भयंकर राग आला. मी त्याचा अपमान केला ही त्याची समजूत दूर करतां करतां माझ्या नाकीं नऊ आले.

त्या खानसाहेबांनी डोळे मोठे करावे किंवा माझ्या मित्रानं माझ्यावर रागवावं हें स्वाभाविकच होतं. स्वतःचेच शब्द जेव्हा स्वतःवर उलटतात—उलटविण्यांत येतात तेव्हा चीड येणं साहाजिक आहे. आपण जेव्हा स्वतःचे दोष दाखवतों, स्वतःची टीका करतां, स्वतःविषयी उडत बोलतों तेव्हा मनांतून आपली इच्छा असते की आपल्या म्हणण्याला लोकांनी महत्त्व देऊं नये. आपल्याला वाटतं की लोकांनी म्हणावं "छे, छे, असं नाही. तुम्ही स्वतःविषयी उगीचच कांही तरी समजूत करून घेतां." मी जेव्हा स्वतःचा चावट म्हणून उल्लेख करतों तेव्हा मला वाटत असतं की इतरांनी म्हणावं, "छे. छे. तुम्ही कसले चावट. तुम्ही किती गंभीर. किती संयमशील." पण असं कुणी म्हणत नाही. माझाच दाखला मला देण्यांत येतो. मी हतबुद्ध होतों आणि चिडतों. हें माहित असूनहि त्या खानसाहेबांच्या व त्या मित्राच्या बाबतींत तीच चूक मी केली. वड्यांचं तेल वांग्यावर काढून आपल्यावर झालेल्या अन्यायाचं परिमार्जन करायचा प्रकार केव्हाहि असमर्थनीयच. बाकी कधी कधी असा अन्याय मला होतो. आपण गमतीनं स्वतःच्या उणीवा दाखवाव्या व त्या दोषनिदानाचं श्रेय लोकांनी आपल्याकडे घेत आपल्यावर टीका करावी म्हणजे काय ! पण हा अनुभव वारंवार येत असूनहि आपण तो टाळत कां नाही ? मी स्वतःवर कधी कधी टीका कां करतों ? या प्रश्नाचं उत्तर शोधतांना मला मोठी मौज वाटते.

वरवर विचार केला तर असं वाटतं की ज्या कारणासाठी तुकारामांनी निंदकांच्या घराशेजारीं आपलं घर बांधण्याचा सल्ला जनतेस दिला आहे त्याच कारणासाठी आपण स्वतःचे दोष उघड्यावर मांडत असूं, स्वतःची असमर्थता प्रगट बोलून दाखवत असूं. पण हा झाला वरवर विचार; शिवाय एकंदर प्रश्नाकडे बघण्याची ही झाली केवळ उपयुक्ततावादी दृष्टि. उपयुक्ततावादी दृष्टीपेक्षा ज्या अधिक सूक्ष्म दृष्टीनं आपण स्वतःला शिव्या देतों, ती होय आनंदवादी दृष्टि. थोडक्यांत सांगायचं तर असं

 म्हणतां येईल की स्वतःला आनंद देण्यासाठी आपण स्वतःला शिव्या देत असतों.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पण ही फार वरची पायरी. त्या अगोदरची पायरी म्हणजे आपल्याला हवी ती स्तुति मिळवणं. त्यासाठीच आपण आत्मनिंदेचं हें साधन वापरत असतों. प्रत्येकाचा अनुभव असा आहे की त्याला हवी तशी—त्या प्रकारची—त्या रूपांतली स्तुति मिळणं मोठं दुष्कर असतं. पुष्कळदा स्तुति मिळते ती मिळमिळीत. असली पातळ स्तुति कुणालाच संतुष्ट करूं शकत नाही. ही पातळ स्तुति कांटेकोर, न्याय्य, इत्यादि असूं शकेल पण संतोषजनक खचित् नसते. एखाद्या साधारण बऱ्यापैकी स्त्रीची स्तुति करायची तर "आपण बऱ्याच चांगल्या आहांत" असं म्हणून भागणार नाही. तें वाक्य ऐकून त्या स्त्रीला संतोष कदापि होणार नाही. असल्या मिळमिळीत स्तुतीपेक्षा ढळढळीत निंदा बरी, खसखशीत शिव्या बऱ्या. स्तुति जशी मिळमिळीत रूपांत पुष्कळदा मिळूं शकते त्याहून अधिक प्रमाणांत ती स्थूल ओबडधोबड प्रमाणांत मिळते. ज्याच्याशीं आपल्याला मतलब आहे अशा माणसाची आपण जो स्तुति करतों ती कपाळोंची स्थूल आणि ओबडधोबड असते. अशी स्तुति थोड्याफार प्रमाणांत प्रत्ये-काला मिळूं शकते आणि मिळतेहि. या ओबडधोबड स्तुतीनाहि आपल्यावर परिणाम होतो—पण हा परिणाम आपल्याला फार आवडत नाही; निदान फार दिवस आवडत नाही. "बैल गाभण आहे" असं आपण म्हणतांच "तेरावा महिना" सांगणारे लोक आपल्याला मिळाले तरी आपण फार दिवस खूष असूं शकत नाही; असलों तर आपल्यासारखे निर्बुद्ध आपणच. आपल्याला प्रशंसा हवी असते पण ही प्रशंसा जशी मिळमिळीत नको तशीच ओबडधोबडहि नको. जिनं आपल्याकडे पाहिलं तरी जिच्या डोळ्यांत पाणी चमकलं नाही अशी प्रिया कुणाला आवडली आहे! आपल्याला पाहतांच एकदम आपल्या गळ्यांत पडून आपल्याला कुस्करून टाकणारी प्रिया आपल्याला कधी कधी आवडेल, पण ती आपल्याला पुष्कळदा जीव नकोसा करून टाकील यांत शंका नाही. अशा दोन्ही प्रकारच्या प्रेयसीपेक्षा अर्थातच आपल्याला विभ्रमशील प्रिया आवडेल. प्रशंसेला विभ्रम शिकवण्यासाठींच आपण स्वतःला शिव्या देतों, तारफेला नखरा यावा म्हणून आपण तिचा ओबडधोबडपणा शिव्यांनी घालवतों. आमच्या त्या खान-साहेबांना जर तुम्ही म्हटलं असतं, "खानसाहेब आपण सगळेच एक दिवस जाणार आहोंत पण तुम्ही वारंवार जाण्याची बात कां करता? खुदानं तुम्हाला इतकं म्हातारं केलं तें लवकर मरण्यासाठी नव्हे; पुष्कळ जगण्यासाठी," तर खानसाहेब निश्चित खूष झाले असते; त्यांना हवी तशी त्यांच्या प्रकृतीची स्तुति ऐकायला मिळाली असती. स्वतःला हवी तशी स्तुति मिळण्याचा आनंद कांही और असतो. हा आनंद मिळण्याऐवजी पुष्कळदा माझ्या मित्राप्रमाणे चिडकेपणाच पदरीं पडतो ही गोष्ट वेगळी.

शिव्यामुळेहि माणसाला आनंद होतो असं मी म्हणालों हें माझ्या ध्यानांत आहे; तसेंच त्यापूर्वी एकदोन पायऱ्यांचं अंतर आहे हेंहि माझ्या लक्षांत आहे. शिव्यांच्या अगोदरची पायरी निरपेक्ष स्तुतीची. माणसाला हवी असते निरपेक्ष स्तुति. निरपेक्ष स्तुति मिळणं कधी तरी शक्य आहे की नाही हा वादाचा प्रश्न झाला. पण माणसाला हवी मात्र असते निरपेक्ष स्तुति. पण कांहीहि झालं तरी बहुधा स्तुतींत कांही तरी हेतु राहणारच. ज्याची प्रशंसा होते त्याच्या लक्षांत हा हेतु आला की त्याच्या आनंदावर विरजण पडतं. "तुम्ही सुंदर दिसतां" असं एखाद्या फोटोग्राफरनं एखाद्याला सुचवलं व तसं म्हणण्यांत गिऱ्हाईक मिळविण्याचा त्याचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हेतु असला तर त्याला गिऱ्हाईक मिळेल पण ज्याला त्यानं सौंदर्याचं प्रशस्तिपत्र दिलं तो मात्र तितकासा प्रसन्न होणार नाही. अशा माणसाला निरपेक्ष शिव्या अधिक आवडतील. शिव्या निरपेक्ष असूं शकतात का हाहि एक मोठा प्रश्न आहेच. पण साधारणतः मागासल्या समजल्या जाणाऱ्या जमातींत निरपेक्ष शिव्या आपल्याला ऐकायला मिळतील. मोठ्यानं बोलणं, उठल्याबसल्या शपथा घेणं हे विशेष सृष्टीशीं ज्यांचं जवळचं नातं आहे अशा साध्या समाजांत सापडतात, तसाच निरपेक्ष शिव्या देण्याघेण्याचा गुणहि सापडतो. पण जग दिवसेंदिवस सुधारत चालल्यामुळे हा गुण लुप्त होत चालला आहे. आपल्या परिचयाचं उदाहरण घ्यायचं तर असं म्हणतां येईल की पुण्यामुंबईच्या सुधारलेल्या माणसापेक्षा नागपूरचा नैसर्गिक माणूस शिव्या निर्मळ मनानं देऊं शकतो. पण आपला नागपूर—वऱ्हाड सुधारत चालल्यामुळे इक-डच्या निरपेक्ष शिव्या नष्ट होत चालल्या आहेत. अर्थात् सुधारणेचे इतर फायदे फार मोठे असल्यामुळे या तोट्याकडे दुर्लक्ष करायलाच हवं. एवढं मात्र खरं की निरपेक्ष स्तुति व निरपेक्ष शिव्या मिळणं शक्य असेल तर आनंदवादी माणूस निरपेक्ष शिव्यांचीच वांछा करील. त्याचं कारण असं की स्तुतीच्या मागचा अपेक्षेचा—हेतुचा भाग काढून घेतला की ती शिव्याहून भिन्न असत नाही. उलट कुठल्याहि भाषेतल्या शिव्यांचा एक गुण असा आहे की त्या स्तुतिपर शब्दांपेक्षा जास्त जोरदार, जोमदार व रसरशीत असतात. या दृष्टीनं पाहिलं तर कुणालाहि चटकन पटेल की शिव्यांची प्रकृति स्तुतीच्या शब्दांपेक्षा जास्त कसदार असते. एखादा सुसंस्कृत, सुसभ्य, सुधार-लेला चांगला माणूस व एखादा रानवट, भोळा गडी यांत जेवढा फरक आहे तेवढाच फरक शब्दांच्या या दोन जातींत आहे. माणूस जितका अधिक नैसर्गिक, जितका अधिक मोकळा, जितका अधिक जोमदार तितका तो अशा शिव्यांचा चाहता असतो. स्तुतीच्या शब्दांपेक्षा शिव्यांमध्ये जीवनसत्व अधिक असल्यामुळे त्याला निरपेक्ष शिव्या निरपेक्ष स्तुतिपेक्षा अधिक आवडतात. पण असल्या निरपेक्ष शिव्या देणारे या सुधारलेल्या जगांत क्वचित्‌च मिळतात. मला स्वतःला अशा शिव्या देणारे लोको-त्तर पुरुष क्वचित् भेटले आहेत. पण ते केवळ मलाच शिव्या देत नाहीत, जो भेटेल त्याला शिव्या देतात. त्यामुळे त्यांच्या शिव्यांतील गंमत कमी झाली आहे. जो भेटेल त्याला प्रसाद देण्याच्या त्यांच्या सवयीमुळे त्यांच्यातील आकर्षकत्व कमी झालं आहे. असे निरपेक्ष शिव्या देणारे लोक एकूण विरळाच. त्यांच्या संगतीचं भाग्य सगळ्यां-नाच मिळत नाही; माझ्या सारख्या दुदैवी माणसाला तें मिळालं तरी सर्वकाळ तें मिळूं शकत नाही. यावर तोड एकच; स्वतःच स्वतःला शिव्या देण्याची. स्वतःच्या शिव्या सर्वांत अधिक निरपेक्ष असतात हें सांगण्याची आवश्यकता नाहीच.

आपण स्वतःला दिलेल्या शिव्या इतरांनी आपल्याला दिल्या की आपण चिडतों याचं कारण हेंच की इतरांच्या निरपेक्षतेची आपल्याला खात्री वाटत नाही. त्यांच्या हेतूचा आपल्याला संशय येतो व हा संशय आपण चिडून व्यक्त करतों. एरवी ही निरपेक्षता आपल्याला पटली तर शिव्या ऐकून होणारा आनंद कांही औरच असतो. तो मिळण्यासाठी स्वतःच स्वतःला लाखोली वहाणं व लोकांच्या हातांत आपल्या विरुद्ध हत्यार देणं हा मार्ग आनंदावाचून कोण स्वीकारील ? नाही म्हणा-यला दुसरा एक मार्ग माझ्या ऐकण्यांत आला आहे पण तो परवडण्यासारखा नाही; मला तर तो नक्कीच परवडणार नाही. लखनऊकडच्या एका राजेसाहेबांनी तो स्वीका-रला होता असं मला कळलं आहे. हे राजेसाहेब नुकतेच परलोकवासी झाले. त्यांचं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नांव कांही कारणास्तव मला देतां येत नाही पण त्यांच्या चरित्रांतल्या एका गोष्टीचा उल्लेख करायचा मोह मला टाळतां येत नाही. या राजेसाहेबांनी चारपांच नोकर एका विशिष्ट कामासाठी आपल्या जवळ ठेवले होते; तें काम गालीप्रदानाचं. रोज राजेसाहेब जेवायला बसले की या नोकरांनी त्यांच्या शेजारीं उभं राह्यचं आणि राजेसाहेबांना एकाहून एक अशा वरचढ शिव्या द्यायच्या. या शिव्या जितक्या जास्त जोरदार तितके राजेसाहेब अधिक खूष होत असत आणि अधिक जेवीत असत.

हा राजेशाही षोक सर्वांना कसा परवडणार ? सर्वांना शक्य आहे एकच मार्ग—स्वतःला शिव्या देण्याचा. त्या शिव्या स्वतःवर उलटण्याचा धोका पत्करून-नहि तेवढाच एक मार्ग माझ्यासारखे सर्व लोक स्वीकारूं शकतात. आपली शिवी आपल्यावर उलटली व आपण मर्यादेबाहेर चिडलों तर या राजेसाहेबांचं नित्य स्मरण करावं म्हणजे चिडण्याऐवजी हास्य, आनंद आपल्या चेहऱ्यावर खेळेल. माझ्या सारखे सर्व शिव्या-प्रेमी, राजेसाहेबांची कांही तरी अशीच सोय स्वर्गात होवो हीच इच्छा करणार !

★

न्याय

★

एकदा एक मोठा मासा लहान माशाला म्हणाला, " मी आता तुला खाणार. तुला खाण्यावाचून माझं जीवन चालूं शकणार नाही ".

मोठ्या माशाचे उद्‌गार ऐकतांच लहान मासा म्हणाला, " पण हा अन्याय आहे. आपण न्यायानं वागायला नको का ? "

मोठा मासा म्हणाला, " बरोबर आहे. मग तूं तरी मला खा. एक तर तूं मला किंवा मी तरी तुला खातों. यापेक्षा अधिक न्यायाचा असा व्यवहार कोणता ? "

लहान माशानं मोठ्या माशाला चावून बघितलं पण तें त्याला जमेना. शेवटीं तो म्हणाला, " नाही बुवा मी तुला खाऊं शकत नाही ".

मोठ्या माशानं लहान माशाला तोंडांत घालत उत्तर दिलं, " मग माझा निरुपाय आहे. मीहि तुझ्यासारखाच न्यायप्रिय आहे. म्हणूनच तुला खाणं मला भाग आहे ".

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक वाद

" ध्वन्यालोक "

प्रा. मधुकर रघुनाथ आष्टीकर

"ध्वनिविषयक प्रचलित निनावी फुटकळ कारिकांच्या आधारें केलेलें विस्तृत टीकात्मक अमूल्य विवेचन;--ध्वन्यालोक"

आलोककार आनंदवर्धन

संस्कृत साहित्यशास्त्रांत ध्वन्यालोकाचें एक निराळेंच महत्वपूर्ण स्थान आहे. 'ध्वन्यालोक' पूर्वी आलोक, काव्यालोक किंवा सहृदयालोक म्हणून ओळखला जात असे. नव्हे तत्कालीन टीकाकारांनी व नकलनवीसांनी तो तसा उल्लेखिलेला आहे सुद्धा. कवि आनंदवर्धन हा त्याचा कर्ता. आनंदवर्धनापूर्वी अनेक रसिकांना काव्याचा आस्वाद घेतांना अवर्णनीय अशा एका नव्याच कल्पनेच्या अनुभूतीने हृदयाला गुदगुल्या होत असत. काव्याचा वाच्यार्थ तो नसे. वाच्यार्थ तर ध्यानांत येईच पण हृदयांतहि एक कसली तरी त्यापलीकडील सुखद संवेदना उत्पन्न होऊन मनाला मोह पाडी. अनुभव येई, दुसऱ्याला सांगता मात्र येईना! तेच शब्द; वाच्यार्थहि लागतात व त्या विलक्षण संवेदनेची तारहि छेडतात; एक नवाच ध्वनि निर्माण करतात आणि रसिकांना वाच्यार्थापेक्षा अधिक आवडे तो तोच! काव्यांत हेंच असावें असें त्यांचें मत बनूं लागलें. तो विलक्षण ध्वनिच काव्याचा आत्मा आहे असें ते बोलून दाखवूं लागले पण त्याचें स्वरूप नीटपणें मांडणें कुणालाहि साधेना. अर्थातच् त्या तत्वाच्या स्वरूपवर्णनांत भिन्नता आली. सर्व एकमताने निर्णय देऊं शकले नाहीत.

अशा परिस्थितीत त्या तत्वाचें स्पष्ट स्वरूप लोकांना प्रथम धडाडीने मांडून दाखविणारा आनंदवर्धन पुढे सरसावला. ह्या नवतत्वाबाबत--'ध्वनि'बाबत, लोकांच्या ज्या अस्पष्ट व विस्कळित कल्पना प्रचलित होत्या त्यावर त्याने आपल्या प्रतिभेचा आलोक फेकून त्यातील विस्कळितपणात एकप्रकारें सुसंगति लावण्याचा प्रयत्न केला.

कारिका, वृत्ति व उदाहरणें

तत्कालीन साहित्यविषयक मूल्यांचे ग्रंथ ज्या पद्धतीने लिहिले जात, त्याच पद्धतीने ' ध्वन्यालोक ' हा ग्रंथ लिहिलेला आहे. मूल्यें संक्षेपाने मांडता यावीत; सहजगत्या मुखोद्गत व्हावीत; मुद्याच्या कल्पना क्रमाक्रमाने मांडता याव्यात म्हणून सूत्र पद्धतीने ग्रंथ लिहिले जात. त्या सूत्रांना ' कारिका ' म्हणून संबोधण्यांत येई.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नंतर स्वतः लेखक किंवा इतर तदनुयायी सूत्रांतील भावार्थ नीट कळावा; विवाद्य व ग्रंथिल मुद्यांचें संदेहनिराकरण व्हावें; कल्पनांची परस्पर संगति क्रमवार व सहज लावतां यावी म्हणून त्या सूत्रांचें विवरण करीत व त्या विवरणास ' वृत्ति ' म्हणून संबोधण्यांत येई. नंतर आपलें प्रतिपादन रसिकमनांवर चांगलें बिंबावें म्हणून दृष्टांत वा उदाहरणें देण्यांत येत आणि म्हणूनच कुठल्याहि संस्कृतसाहित्य मूल्यविवेचक ग्रंथाचें स्वरूप बहुधा कारिका, वृत्ति व उदाहरणें अशा तीन विभागांत प्रतीत होतें.

ग्रंथकर्त्यांची स्वतःबद्दल उपेक्षा

बहुतांश संस्कृत ग्रंथकार विनयामुळे म्हणा वा रूढीमुळे म्हणा आपल्या ग्रंथांत फारच फार आपल्या नांवाचा तेवढा उल्लेख करतांना आढळतात पण इतर कुठलीहि माहिती उल्लेखित नाहीत. पण त्यामुळे ग्रंथांच्या कर्त्यांबाबत नेहमीच अनेक वाद उपस्थित होतात.पुष्कळदा त्याचा काळहि ठरविणें आवाक्याबाहेरचें असतें. संस्कृतसाहित्यांतील मूल्यांचें मापन करणाऱ्या ह्या ग्रंथांच्या वर उल्लेखिलेल्या त्रिवेणी लेखनपद्धतीमुळे तर ग्रंथकर्त्याबाबतच्या वादांत आणखी एक मुद्दा निर्माण होतो व तो म्हणजे ' कारिका ' व त्यावरील सोदाहरण ' वृत्ति ' ह्यांचें कर्तृत्व एकाचेंच होय की, ' कारिका ' एकाने लिहिल्या व सोदाहरण ' वृत्ति ' तदनुयायाने केली. कांही ग्रंथांत कारिका व सोदाहरण वृत्ति एकाच व्यक्तीने लिहिल्या, ह्याबाबत उल्लेख सांपडतो. उदा० वामनाने " काव्यालंकारसूत्रें " स्ववृत्तीनेच विभूषित केल्याचा उल्लेख मंगलाचरणांत केलेला आहे.* पण कांही ग्रंथांत मात्र अशा उल्लेखाच्या अभावी कारिका व सोदाहरणवृत्ति ह्यांच्या एककर्तृत्वाबाबत वाद माजविला जातो. ध्वन्यालोकाबाबत असाच वाद उपस्थित झाला आहे. ध्वन्यालोकांतील वृत्ति व उदाहरणें एकाचीच होत असें कांही मानतात पण कारिका आणि वृत्ति ह्यांच्या कर्तृत्वाबाबत मात्र ते द्वैतवादी दिसतात.

कारिकांचा कर्ता कोण ?

महामहोपाध्याय काणे, डॉ. बूल्हर, डॉ. जेकोबी, डॉ. डे, डॉ. शंकरन्, डॉ. के. सी. पांडे व प्रो. सोवनी आदि विद्वानांनी ह्या वादांत यथामति रंग भरलेला आहे. कारिकांचा कर्ता आनंदवर्धनाहून भिन्न आहे असें मानणाऱ्या पंडितांपैकी प्रा. सोवनींनी तर कारिकाकाराचें नांव शोधून तो आरोप शाबित करण्याचा प्रयत्न केला आहे. दाक्षिणात्य ' शोभन ' नांवाच्या कवीच्या मताचा आधार घेऊन त्यांनी " सहृदय " हें त्या ध्वनिकारिकांच्या कर्त्याचें नांव होय असें मत दिलें आहे. म. म. काणे यांनीं आणखी एक पायरी पुढे जाऊन आपलें नवीन संशोधन पुढे आणलें की " सहृदय " हा आनंदवर्धनाचा प्रत्यक्ष गुरूच होता. ते म्हणतात "... and आनंदवर्धन was his pupil ... This would serve to explain the confusion of authorship that arose within short time". (पहा साहित्यदर्पण प्रस्तावना LXIII)

---

* प्रणम्य परमं ज्योतिर्वामनेन कविप्रिया ।
काव्यालङ्कारसूत्राणां स्वेषां वृत्तिर्विधीयते ॥
(कां. सू. १)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री काण्यांचें आत्मघातकी संशोधन

म. म. काणे यांचें हें संशोधन त्यांच्या पक्षाला समूळ नाहींसें करणारें ठरतें. "सहृदय" हा शब्द पहिल्याच "कारिकेंत" आलेला आहे.* आणि 'सहृदय' हें जर कारिकाकाराचें नांव आहे असें मानलें तर त्या नांवाचा उल्लेख ज्या ओळींत असा आला आहे की* "सहृदयाच्या मनांत माझ्याविषयीं प्रेम रहावें म्हणून मी त्या ध्वनीचें स्वरूप सांगतों" त्या ओळी सहृदयानेच लिहिल्या असणें कदापीहि शक्य नाही. त्या त्याच्या शिष्याने, आनंदवर्धनानेच लिहिल्या असल्या पाहिजेत ! आणि त्या ओळी जर कारिकेंतल्या आहेत तर कारिका ह्या सहृदयाच्या आहेत असें कसें मानतां येईल ? गुरुला उद्देशून लिहिलेल्या वरील ओळी आनंदवर्धनाच्याच राहूं शकतात. त्या ओळी म्हणजे कारिकाचा एक भाग आहे. अर्थात् आनंदवर्धन हाच कारिकाकार आहे, असाहि निष्कर्ष निघूं शकतो !

कारिका व वृत्ति एकाच व्यक्तीने लिहिल्या नाहीत.

वरील विवेचनाचा असा मात्र अर्थ नाही, की कारिका व वृत्ति ह्या दोन्हीहि आनंदवर्धनानेच लिहिल्या आहेत असें आमचें मत आहे उलट आम्ही प्रथमच सांगून टाकतों की आमचें असें स्पष्ट मत आहे की कारिका आनंदवर्धनाने लिहिलेल्या नाहीतच. कुण्याहि प्रामाणिक व निःपक्षपाती वाचकास, त्याने ध्वन्यालोक नीट अभ्यासला तर, हेंच मत पटेल. कारण अनेक ठिकाणीं कारिका व वृत्ति ह्यांच्या विषय व विचार प्रतिपादनांत फारच तफावत आढळते. 'कारिकेंत नसलेले विचार त्यावरील 'वृत्तींत आढळतात. तसेंच कांही ठिकाणीं कारिकेंतील विचार आपणांस हवे तसे फिरवलेले दिसतात किंवा त्यांत मनमानेल तेवढी पदरची भर घातलेली दिसते. कारिकाकार व वृत्तिकार जर एकच असते तर त्यांनी असली विसंगति येऊं दिली नसती. कारिकांत इष्ट असलेले विचार अत्यंत संक्षेपाने कां होईना पण मांडले असते व मग पूर्ण विवेचन वृत्तींत केलें असतें. वरील प्रकारच्या वृत्तिकाराच्या स्वैरसंचाराचीं उदाहरणें डॉ. डे व डॉ. जेकोबी ह्यांनी अनेक दिलेलीं आहेत. ध्वन्यालोकाचा प्रसिद्ध व तत्कालीन टीकाकार अभिनवगुप्त ह्यानेसुद्धा आपल्या अमोल "लोचन" टीकेंत कारिकांच्या व वृत्तींच्या विषय-प्रतिपादनांत व विचारांत दिसणाऱ्या फरकांचीं अनेक उदाहरणें दिलेलीं आहेत व त्याद्वारें जणूं सुचविलें आहे की कारिकाकार हा वृत्तिकाराहून कदाचित् वेगळा तर नसेल ! अमरावतीचे प्रा. ग. त्र्यं. देशपांडे ह्यांनीसुद्धा असाच आशय प्रतिपादन केलेला आहे. केवळ सलग कारिका वाचल्यास त्यांत रसविषयक एकच विचार अनुस्यूत दिसतो पण वृत्तींत मात्र अनेक विचारांचें कडबोळें झालेलें आहे असला सूर देशपांडे यांच्या प्रतिपादनांत उमटलेला आहे+ सारांश कारिका आनंदवर्धनाने लिहिलेल्या नाहीतच, या आमच्या मताला भक्कम आधार आहे.

डॉ. के. सी. पांडे यांचें विवेचन

वृत्तींतील ह्या अग्यापारेषु व्यापाराबद्दल व डॉ. डे व डॉ. जेकोबी ह्यांनी मांडलेल्या मुद्द्याबद्दल डॉ. के. सी. पांडे यांनी विवेचन करतांना वृत्तिकाराच्या

---

* "तेन ब्रूमः सहृदयमनः प्रीतये तत्स्वरूपम्"

(कारिका १ ली. ध्वन्यालोक.)

+ महाराष्ट्र साहित्य पत्रिका अंक १०१ व १०२.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्या स्वैरपणाचें समर्थन करून कारिकांचें कर्तृत्वहि आनंदवर्धनाचेंच आहे असें आपलें मत दिलें आहे* अर्थात् त्यांच्या मतांचा संक्षेपानें कां होईना पण विचार करणें क्रमप्राप्तच आहे. डॉ. पांडे यांचें म्हणणें असें की, "कारिका आणि वृत्ति ह्यांतील प्रतिपादनांत व विचारांत एकता नसेल पण परस्पर विरोध तर नाही ना ?"*१ आणि त्यांचा दुसरा मुद्दा असा की, "वृत्तिकाराने कारिकेंतील विचारांत बरीच सुधारणापूर्वक भर घातली आहे, बरेच फेरफार केले आहेत व त्यांना अधिक व्यापक केलें; पण हें केवळ कारिका सुसंगत लागाव्यात म्हणून केलेलें आहे आणि वृत्ति ही एवढ्याकरिताच लिहिलेली असते."+२

डॉ. पांडे यांचा हा दुसरा मुद्दा आम्हालाहि मान्य आहे. वृत्तीने हेंच करावयास पाहिजे असें आमचेंहि मत आहे. पण आम्हास आश्चर्य वाटतें तें हें की ह्या दुसऱ्या मुद्द्यावरून असें कसें अनुमान निघतें की कारिका व वृत्ति एकाच व्यक्तीने लिहिल्या ! ह्यावरून फार तर आनंदवर्धनाने हा जो स्वैरपणा केला त्याद्वारें कारिकां-वर कुठल्याहि प्रकारें अन्याय केला नाही, उलट वृत्तिकाराने दुसऱ्यांच्या कारिकावर टीका लिहितांना जी 'वृत्ति' ठेवावयास पाहिजे तीच त्याने ठेवलेली आहे, असें म्हणतां येईल. मूळ कारिकांत अमूक एक गोष्ट कमी आहे म्हणून आपणाहि ती कमतरता भरून काढूं नये किंवा मूळांतला एक विचार थोडा विसंगत वाटतो तो सुसंगत करण्यास थोडा फिरवला तर मोठें पाप होईल म्हणून तो आहे तसाच आपणहि आपल्या शब्दांत मांडावा असें केवळ होपयाचें काम वृत्तिकाराचें नव्हे हें ओळखून आनंदवर्धन वागलेला आहे. आणि म्हणूनच डॉ. पांडे यांच्या ह्या मुद्द्यावरून असेंच अनुमान निघतें की कारिका, वृत्तिकार आनंदवर्धनाने लिहिलेल्या नाहीत. कारण तोच जर कारिकांचा लेखक असतां तर वृत्ति लिहितांना कारिकांत आढळणारी न्यूनता किंवा वैचारिक विसंगति वा कमी अधिकपणा ह्मणा एखादा अधिक शब्द घालून किंवा बदलून त्याला घालवितां आला नसता असें नाही. पण कारिकांचें कर्तृत्व स्वतःचें नसल्यामुळेच वृत्तींत त्याला ही सगळी वैचारिक कसरत करावी लागली, असें सहज सिद्ध होतें.

आता डॉ. पांडे यांच्या पहिल्या मुद्द्याबाबतहि थोडे विवेचन करूं. कारिका व वृत्ति ह्यांत परस्पर विरोध असेल तर ते कारिकाकार हा आनंदवर्धनाहून भिन्न आहे असें कदाचित् मानावयास तयार होतील, आम्ही हेंहि त्यांच्या निदर्श-नास आणतों.

योऽर्थः सहृदयश्लाघ्यः काव्यात्मेति व्यवस्थितः । वाच्य प्रतीयमानाख्यौ तस्य भेदावुभौ स्मृतौ ।। ह्या कारिकेंतील दुसऱ्या ओळीचा अर्थ वृतिकारास मुळीच लावतां आला नाही. काव्यात्मा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ध्वनीचें वाच्य व प्रतीयमान असे दोन भेद आहेत असा केवळ त्या कारिकेंतील ओळीचा अन्वय सांगून वृत्तिकार पुढे सरतो. नाही तेव्हा सरळ कारिकांचेंसुद्धा पदच्छेद घालून पल्लेदार विवेचन करणारा

* 'Abhinava Gupta'—A study by Dr. K. C. Pande. A thesis approved by Lukhnow University; Pages 132 to 136.

*1 See page 132 of "Abhinava Gupta—A study by Dr. K. C. Pande

+2 See page 136 ibid.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आनंदवर्धन ह्या ठिकाणीं स्पष्टीकरणाची आवश्यकता असतांहि तें न करतां पुढे कसा गेला ? कारण वाच्याहून ध्वनि हा अगदीच वेगळा असतांना वाच्य हा काव्यात्मा असलेल्या ध्वनीचाच एक प्रकार आहे असें वाचतांना वाचक संभ्रमांत पडतो. वाच्य हा ध्वनिभेद आहे हें म्हणतांना कारिकेंतील "भेद" ह्या शब्दाचा पुढे अभिनवगुप्ताने "लोचनांत" जसा अर्थ* लावून दाखविला व साधारण वाचकांस वाच्य हा एक ध्वनिचाच प्रकार होय या म्हणण्यामुळे पडणारा संभ्रम दूर केला तसें वृत्तिकाराने करणें आवश्यक होतें.

पुढे तिसऱ्या कारिकेचेंहि त्याने कांहीच विवरण केलें नाही. तेथेहि आवश्यकता होती. उपमादि प्रकारांनीं प्रसिद्ध असलेला ध्वनीचाच एक प्रकार (भेद) जो 'वाच्य' तो काव्यलक्षणकारांनी अनेकवार स्पष्ट केला आहे *१ ह्या म्हणण्यांतील उपमादींना तो ध्वनीचा प्रकार म्हणतो हें काय गौडबंगाल आहे हें सामान्य वाचकास कसें कळणार ?

त्यानंतर चौथी कारिका घ्या. त्यांतील "प्रतीयमान" *२ ह्या अर्थाचें विवरण वृत्तिकाराने केवळ व्यंग्यार्थ असें केलेलें आहे. पण ती चूक आहे कारिकाकाराला तो अर्थ अभिप्रेत नाही. कारण पुढील पाचवीच कारिका प्रतीयमान अर्थ म्हणजे काय हें स्पष्ट करते. कारिकाकाराला प्रतीयमान अर्थ तो "रस" हेंच अभिप्रेत आहे. पहा—

काव्यस्यात्मा स एवार्थः [प्रतीयमान] तथाचादिकवेः पुरा।
क्रौञ्चद्वन्द्ववियोगोत्थः शोकः श्लोकत्वमागतः ॥ ध्व. ५

ध्वनीचा हा प्रतीयमान-अर्थ-प्रकार म्हणजे रस होय हें ह्या कारिकेने स्पष्ट केलें आहे. शोक हा करुणरसाचा स्थायीभाव होय. कारिका जर आनंदवर्धनाच्या असत्या तर 'प्रतियमान अर्थ' स्पष्ट करतांना चूक झाली नसती.

श्री. पांडे यांचा तिसरा मुद्दा असा की "ध्वनिकारिका व वृत्ति एकाच लेखकाची नसती तर ध्वन्यालोक ग्रंथांत दोन मंगलाचरणें असतीं, एक कारिकाकाराचें व एक वृत्तिकाराचें. पण प्रस्तुत प्रसंगीं एकच मंगलाचरण आढळतें." ध्वन्यालोकांतील एकाच मंगलाचरणावरून पांडे यांनी कारिका व वृत्ति एकाच्याच आहेत हें जें अनुमान काढलें आहे तें चूक आहे. कारण तें मंगलाचरण फक्त 'वृत्ति'चें आहे. कारिकाकार व वृत्तिकार एकच असते तर कारिका प्रथम या न्यायाने मंगलाचरण कारिकाकरिता योजलें असते, वृत्तिकरिता नव्हे.

---

* अर्थात् अभिनवगुप्ताने लावलेल्या अर्थाबद्दलसुद्धा मतभेद होणें शक्य आहे.

*१ तत्र वाच्यः प्रसिद्धो यः प्रकारैरुपमादिभिः।
बहुधा व्याकृतः सोऽन्यैः काव्यलक्ष्मविधायिभिः ॥ ध्व. ३

*२ प्रतीयमानं पुनरन्यदेव वस्त्वस्ति वाणीषु महाकवीनाम्।
यत्र तत् प्रसिद्धावयवातिरिक्तं विभाति लावण्यमिवाङ्गनासु ॥ ध्व. ४

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आमचें नवें मत

आमचें ह्या कारिकांच्या कर्त्याबाबत असें स्पष्ट मत आहे की कारिका ह्या आनंदवर्धनाच्या तर नाहीतच पण त्या कुण्या एकाच विशिष्ट ज्ञात व्यक्तीनेहि लिहिलेल्या नाहीत.—"सहृदय" नांवाच्या कुण्या आनंदवर्धनाच्या गुरूने तर नाहींच नाही.

आनंदवर्धनापूर्वी ध्वनिविषयक बराच विचार झालेला होता. नव्हे बुधांनी त्या ध्वनीला काव्यात्म्याच्या श्रेष्ठपदापर्यंत चढविलेलें होतें. अर्थात् तद्ध्वनिविषयक बरेचसे विचार लोक बोलून दाखवित असलेच पाहिजेत. तत्कालीन पद्धतीनुसार ते विचार सूत्रस्वरूप कारिकाद्वारें अनेकांनी लोकांत प्रसृत केले असले पाहिजे आणि लोकांत प्रस्तुत असलेल्या असल्या निनावी अनेक फुटकळ कारिका जमवून आनंदवर्धनाने त्यावर आपली सोदाहरण वृत्ति लिहिली हेंच एकमेव सत्य असलें पाहिजे.

कारण·········

(१) कारिका प्रचलित होत्या त्यांचें कर्तृत्व कुण्या एकाचेंच नव्हतें आणि म्हणूनच त्या कारिकांना स्वतंत्र मंगलाचरण नाही. म्हणूनच ध्वन्यालोकांत फक्त एकच मंगलाचरण आहे व तें वृत्तिकाराचें व वृत्तीलाच असलेलें.

(२) आणि म्हणूनच आनंदवर्धन कुण्या एका व्यक्तीचा कारिकाकारक म्हणून कृतज्ञतापूर्वक उलेख करूं शकला नाही.

(३) आणि म्हणूनच अभिनवगुप्त, कारिकाकृत् किंवा मूलग्रंथकृत् म्हणून केवळ उल्लेख करतो. विशिष्ट व्क्तीचें नांव त्याला सांगतां आलें नाही. ध्वन्यालोकांतील एका श्लोकाचा कर्ता 'मनोरथ' कवि आहे म्हणून त्याने सांगितलें. जर कारिकाहि कुण्या विशिष्ट लेखकाच्या असत्या तर त्याला तें माहिती असतेंच व त्याने त्याचा उल्लेख केला असताच. उलट तो असें म्हणतो की ध्वनिविषयक पुष्कळच चर्चा, पुष्कळ विद्वान करीत आहेत. तद्विषयक परंपरा आढळते पण त्या ध्वनीचें विवेचन करणारें विशिष्ट पुस्तक मात्र कुणी लिहिलेलें नाही. ह्याचाच अर्थ असा की निनावी फुटकळ ध्वनिकारिका लोकांत प्रचलित होत्या. "अविच्छिन्नेन प्रवाहेण तैरुक्तम्। विनापि विशिष्ट पुस्तकेषु विवेचनात्।" (लोचन० पान नं. २ By अभिनवगुप्त.)

(४) आणि म्हणूनच थोडक्यांत विषय मांडतां यावा या उद्देशाने त्याकाळीं कारिका लिहिल्या जात असूनहि ह्या ध्वनिविषयक कारिकांत पुनरुक्ति आढळते. ध्वनीची तीच ती व्याख्या केवळ कांही शब्द बदलून तीन वेळा आलेली आहे (कारिका १३, १६ व १८). चवथ्या उद्योतांत तर ह्या पुनरुक्तीचा कहर झाला आहे. केवळ ध्वनीसाधनेचें फळ—तेंच तें पण पुनः केवळ कांही शब्द बदलून लागोपाठ चार कारिकांत सांगितलें आहे. (कारिका १०५; १०६; १०७; व १०८ पहा) विस्तारभयास्तव आणखी उदाहरणें देत नाही. पण हें खरें की ह्या कारिकांचा कुणी एक लेखक असता तर ही अशी पुनरुक्ति झाली नसतीच.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(५) आणि म्हणूनच ध्वनीला कधी काव्यात्मा म्हटलें आहे, तर कधी केवळ एक प्रकारचा अर्थ म्हणून त्याला संबोधिलें आहे; तर पुनः केव्हा ध्वनि म्हणजे एक विशिष्ट काव्यप्रकार म्हणून मुक्तकंठाने स्तविला आहे. एक कारिका रसाला आत्मा म्हणते, तर दुसरी व्यंग्यार्थालाच (मग तो रस असो वा इतर कांही); मग काव्याचा आत्मा ध्वनि ह्याचा अर्थ काय करायचा ? ध्वनि म्हणजे रस की संपूर्ण व्यंग्यार्थ ? बरें यांतून वाट काढावी तर तिसरी कारिका म्हणते की ध्वनि हें प्रधान व्यंग्यार्थयुक्त काव्याचे नांव आहे. मग "काव्यस्यात्माध्वनि" म्हणजे काय समजावें ? विशिष्ट प्रकारचें काव्यच काव्याचा आत्मा म्हणावें ? ? ! सर्व कारिकांचा लेखक एकच असता तर असली विसंगति दिसली नसती.

(६) आणि म्हणूनच १३ वी*१ सापेक्ष कारिका मागल्या १२ वीशीं किंवा पुढील १४ वीशीं जुळत नाही. व तिच्यांतील "वा" ह्या शब्दाचा अर्थ व "व्यङ्क्तः" ह्या द्विवचनी क्रियापदाची सांगड लावतां लावतां टीकाकारांची हि भंबेरी उडते.

(७) आणि म्हणूनच "मुकुला"ला व "प्रतीहारेन्दुराजाला," ध्वनीच्या कारिकांच्या कर्त्याबाबत कुण्यातरी एका व्यक्तीचें नांव सांगणें शक्य नव्हतें; व "ध्वनि" तत्व केवळ सहृदयच जाणूं शकतात असें कारिकांतील प्रतिपादनावरून प्रथम ध्वनीचें प्रतिपादन करणारे ध्वनिकारिकाकार तेहि सहृदयच होत ह्या कल्पनेने त्यांनी त्या ध्वनिकारिकांच्या कर्त्याबद्दलचा अनेकवचनी उल्लेख "सहृदयैः" अशा शब्दांत केलेला असावा.+१

वरील सर्व विवेचनावरून हें सहज सिद्ध होतें की ध्वनिकारिकांचें कर्तृत्व कुण्याहि एका व्यक्तीचें नाही. त्या निनावी फुटकळ कारिका आनंदवर्धनाचे काळीं साहित्य पंडितांत प्रचलित होत्या. आनंदवर्धनाने त्या एकत्रित केल्या व आपला ध्वनिविषयक ग्रंथ लिहितांना तत्कालीन संस्कृत साहित्यविषयक ग्रंथलेखन पद्धतीस अनुसरून कारिका हव्यात म्हणून त्या प्रचलित फुटकळ कारिका तोंडीं लावल्या व शक्यतों त्या कारिकांत क्रमवार संगति लावण्याचा प्रयत्न केला.

---

*१ यत्रार्थः शब्दो वा तमर्थमुपसर्जनीकृतस्वार्थौ ।
व्यङ्क्तः काव्यविशेषःस ध्वनिरिति बुधैः कथितः । ध्व. १३

+१ अभिधावृत्तिमातृका पहा. पान १९ व २१. "लघुवृत्ति" पहा. पान ७५.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक साहित्यिक कुतुहल

आम्रमहिमा

[आंब्याच्या या मोसमांत हें रसाळ खंडकाव्य एक कुतुहल म्हणून आह्मी सादर करीत आहोंत. हें काव्य प्रथमतःच प्रसिद्ध होत आहे. या काव्याचा कर्ता, काळ, शैली इत्यादि विपयक तर्क आणि विचार वाचकांनी आमचेकडे पाठवावे—संपादक]

आतां सांघैन अंब्रफळाचें[१] महिमान। श्रोतां[२] आइकावें देउनि अवधान। मिं विनोदु[३] बोलिलों पाहात सज्ञान। साहित[४] वोवीये माजि ॥१॥ जे बनीं अंब्रवृक्ष नाहीं। तें आघवेंचि अमंगळ बन पाहीं। दिनकरेंवीण[५] दीशा दाही। शून्य दीसताति ॥२॥ कैसी अंब्रवृक्षाची थोरी। सकळ वृक्ष रूळताति[६] तोडरीं[७]। जयाचिया फळाची देखौनि उभारी। लोपति सकळै फळें ॥३॥ आइका अंब्रफळाचा प्रतापु। जगीं आपणयातें म्हणाविला बापु[८]। जयाचा देखौनि अटपु[९]। वेधु उपजे जगा ॥४॥ आंबा आला ऐसी आइकौनि मातु[१०]। हरिखु जाला सकळ जन आंतु। आणि आकांत वर्तला सकळ फळांतु। जन नरनारी आनंदले ॥५॥ मग गाडां[११] बैलीं[१२] नगरामधीं। आंबा आला उभया राजवीदी[१३] ॥ तवं सकळ फळें पळौनियां सांदीं[१४] ॥ लाजा रिगों पांति[१५] ॥६॥ ऐसा आंबा आला चौबारां[१६]॥ हाटामाजि[१७] राहिला शिरा[१८] ॥ तवं सकळफळीं रागु सांडिला गारा ॥ तयातें देखौनियां ॥७॥ ऐसा तो आंबा देखौनि नयेनीं[१९] ॥ बुद्धि उत्तरली[२०] सकळ फळावरौनि। वेधें धांवताति नरनारी दृष्टी सूनि[२१] ॥ तेया आंबेयाचि कडे ॥८॥ ऐसि आवघेयांचि उत्तरली कळा[२२] ॥ आंबा यशश्रये[२३] आगळा[२४] ॥ आतां कैसें वर्तलें येरां फळा ॥ तें सांघे कवी ॥९॥ कैसें अंब्रफळ देखौनि रसाळें ॥ पोटीं [२५]पाणियें आटलीं नारिएळें। काळीं जालीं जांबुळें ॥ देखतु[२६] खेवो[२६] ॥१०॥ आणि देखौनि अंब्रफळाचें माहिमान॥ कर्दळीं[२७] घातली खालुती मान ॥ द्राक्षें जालीं[२८] वीवर्ण[२९]॥ अपुलां टाई ॥११॥ ऐसें देखौनि अंब्र फळ गोमटें ॥ फणसां चालिलीं हिंवें[२९] आंगा आले कांटे ॥ वालुकाचें हृदये फुटे ॥ तियें उललिं[३०] मधीं ॥१२॥ देखौनि अंब्रफळाची प्रौढी ॥ दाळींबें उभीं तडलीं[३१] झाडीं ॥ पोट फोडौनि पाहाताति तवं आंतु कोरडीं ॥ त्रिंबें सांडु पाहाताति ॥१३॥ ऐसीं आइकौनि अंब्रफळाची थोरी ॥ रितुपें[३२] पळौनि गेलीं अति दूरीं ॥ तें अद्यापि राहिलीं दीपांतरीं[३३] ॥ समुद्रामाजि ॥१४॥

---

१ आंबा २ श्रोत्यांनी. ३ सुरस रीतीने. ४ साहित्य. ५ सूर्यावाचून. ६ शोभतात. ७ पायांतील दागिन्याच्या ठिकाणीं. ८ श्रेष्ठ, अपूर्व. ९ डौल. १० बातमी, वार्ता. ११ गाड्यांत. १२ बैलांनी. १३ मुख्य पेठेंत राजरस्त्यावर. १४ कोपऱ्यांत १५ शिरूं लागली; [शिरू पाहतात.] १६ चव्हाट्यावर, १७ बाजारांत. १८ अग्रभागीं, प्रमुख जागीं. १९ डोळ्यांनी. २० मन उतरलें; फळें मनांत भरेनात २१ नजर देऊन, टकमक पाहून. २२ शोभा गेली. २३ यशश्रीने. २४ अधिक. २५ पाण्याने २६ पाहतांक्षणींच. २७ केळीं. २८ फिकट झालीं, रंग उतरला. २९ हिंव, थंडी. ३० उकललीं. ३१ तडा गेला, फुटलीं. ३२ एका फळाचें नांव ३३ अन्यद्वीपांत.

[शेष मुखपृष्ठ ३ वर]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

ना. रा. शेंडे,
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

वार्षिक साधारण सभा

विदर्भ साहित्य संघाची वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक २६-४-१९५३ रोजीं सायंकाळीं ४-३० वा. वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली केन्द्रीय कार्यालयांत भरली.

सभेंत खालील कामकाज झालें :

(१) सरचिटणिसांनी दि. १४-९-५२; दि. ११-१-५३ व दि. १४-३-५३ रोजीं भरलेल्या साधारण सभांचे अहवाल वाचून दाखविले व हे अहवाल मंजूर झाले.

(२) माजी सरचिटणीस श्री. ह. ना. नेने यांनी १९५२-५३ सालचें कार्यवृत्त वाचून दाखविलें व तसेंच १९५२-५३ सालचे हिशेब त्यांनी सभेला सादर केले. ते मंजूर झाले.

नंतर श्री. र. वि. कुळकर्णी यांनी सुचविलेला व प्रा. पां कृ. सावळापूरकर यांनी दुजोरा दिलेला खालील ठराव एकमताने मंजूर झाला :

ठराव : " मागील १९५२-५३ वर्षामध्ये विदर्भ साहित्य संघाने भरीव कार्य केल्याबद्दल ही सभा कार्यकारी मंडळाला धन्यवाद देते. विशेषतः कार्यकारी मंडळाचे सरचिटणीस श्री. ह. ना. नेने व चिटणीस श्री. ना. रा. शेंडे, तसेंच कोषाध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या अविरत श्रमाबद्दल ही सभा त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करीत आहे. "

(३) १९५३-५४ सालचे अंदाजपत्रक, किरकोळ बदल करण्यांत येऊन, सर्वानुमतें मंजूर झालें.

(४) १९५३-५४ सालासाठी श्री. महेश्वरराव गद्रे यांची अधिकृत हिशेब तपासणीस ह्मणून एकमताने निवड करण्यांत आली.

(५) साधारण सभा नियम १० (ई)—चा खुलासा सुचविणारा का. का. चा खालील ठराव मंजुरीसाठी सभेपुढे ठेवण्यांत आला

"साधारण सभा १० (ई)—संघाच्या कोणत्याहि साधारण सभेची सूचना सभेच्या दिवसांपूर्वी पंधरा दिवस अगोदर मध्यप्रदेशांतील प्रमुख दोन मराठी वृत्तपत्रांतून कार्यालयाने जाहीर करावी."

खुलासा सुचविणाऱ्या या ठरावावर साधक बाधक चर्चा होऊन हा ठराव 'घटनाविषयक प्रश्न समिति'कडे विचारार्थ पाठवावा असें ठरलें.

(६) वि. सा. संघाच्या अमरावती शाखेने एकमताने मंजूर केलेला खालील ठराव सभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यांत आला :—

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
अनुक्रमणिका

१ मोझरी येथे वाटलेल्या Who is who पत्रकाबद्दल संघशाखेच्या चार जबाबदार पदाधिकाऱ्यांनी जें निषेधात्मक पत्रक ता. १९-३-५३ रोजीं संघाध्यक्षांकडे प्रसिद्धीकरिता पाठविलें आहे, त्या पत्रकास ही सभा संपूर्णपणें पाठिंबा देत आहे.

२ या पत्रकाचा लेखक कोणीहि असला तरी, या पत्रकाने संघाच्या प्रतिष्ठेस व एकतेस बाधा येत आहे, असें या सभेचें स्पष्ट मत आहे. म्हणून अशा या कृत्याबद्दल ही सभा त्या लेखकाचा तीव्र निषेध करते.

३ संपूर्ण चौकशीअंतीं Who is who या पत्रकाचा लेखक संघसभासद आहे असें मध्यवर्ती कार्यालयास आढळून आल्यास त्याच्या विरुद्ध मध्यवर्ती कार्यालयाने योग्य ती कारवाई करावी.

वरील ठरावांतील कलमें नं. १ व नं. २ सर्वानुमतें मान्य झालीं.

कलम नं. ३ मधील मध्यवर्ती कार्यालय या शब्दाऐवजीं 'कार्यकारी मंडळ' अशी दुरुस्ती करून तें कलम खालील प्रमाणे सभेच्या मंजुरीसाठीं ठेवण्यांत आलें :–

" संपूर्ण चौकशी अंतीं Who is who या पत्रकाचा लेखक संघसभासद आहे असें कार्यकारी मंडळास आढळून आल्यास त्याच्या विरुद्ध कार्यकारी मंडळाने योग्य ती कारवाई करावी "

या कलमावर साधकबाधक चर्चा होऊन, श्री. अ. दा. ओक यांनी खालील उपसूचना सभेपुढे आणली, तिला श्री. म. न. अंजीकर यांनी अनुमोदन दिलें.

" वरील ठरावांतील कलम ३ मध्ये उल्लेखिलेली चौकशी कार्यकारिणीने करून तिचा अहवाल सर्व साधारण सभेपुढे मंजुरीसाठीं ठेवावा."

या उपसूचनेवर मतें घेण्यांत येऊन ४ विरुद्ध १४ मतांनी ही उपसूचना नामंजूर झाली.

नंतर सभाध्यक्षांनी दुरुस्ती सुचविलेल्या कलम ३ सह संपूर्ण मूळ ठराव मताला टाकला व तो एकमताने मंजूर झाला.

• • •

वि. सा. संघाच्या मंदिर उभारणीच्या कामाला सुरुवात

विदर्भ साहित्य संघाच्या मंदिराच्या पायाखोदणीच्या कामाला दि. ७-५-५३ रोजीं, संघाध्यक्ष प्रा. म. श्री. पंडित यांच्या उपस्थितींत, सुरुवात झाली. त्यावेळीं मंदिर रचना समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ति मंगळमूर्ति, आमंत्रक श्री. नानासाहेब जोग, मंदिरनिधि समितीचे आमंत्रक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, सरचिटणीस श्री. ना. रा. शेंडे, श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. बाबूराव चिमोटे, श्री. रावळे प्रभृति मंडळी उपस्थित होती.

• • •

सरचिटणिसांची भंडारा शाखेला भेट

सरचिटणीस श्री. ना. रा. शेंडे यांनी रविवार दि. १७-५-५३ रोजीं सकाळीं भंडारा वि. सा. संघशाखेला भेट दिली. शाखेचें कार्य उत्साहाने व हिरीरीने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केलें जात असल्याचें आढळून आलें. सरचिटणिसांनी तेथील कांही कार्यकर्त्यांच्या भेटी घेऊन वि. सा. संघाच्या प्रगतीच्या दृष्टीने चर्चा केली.

शाखेचे चिटणीस श्री. वसंतराव शद्रे व मध्यवर्ती का. का. मंडळाचे सभासद श्री. ना. खं. उर्फ बाळासाहेब तिरपुडे यांनी सरचिटणिसांना कार्याची साद्यंत माहिती दिली. साधारण सभासद व विशेषतः जास्तींत जास्त आजीव सभासद बनाविण्याचें काम जोमाने सुरू आहे, असें निदर्शनास आलें.

गोंदिया वि. सा. संघ शाखा :

शाखेचे दोन समारंभ

गोंदियाच्या वि. सा. संघशाखेने केन्द्र मंदिरनिधि व स्थानिक मंदिरनिधि यांच्या मदतीकरिता १९-१-५३ ला सौ. हिराबाई बडोदेकर यांच्या गायनाचा जलसा न्यायमूर्ति के. तु. मंगळमूर्ति यांच्या अध्यक्षतेखाली भरविला. त्यावेळीं मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. पट्टाभि सीतारामय्या हेहि खास व सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांचाहि संघशाखेला आशीर्वाद लाभला. त्याचवेळीं विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षांचीं प्रमाणपत्रें माननीय राज्यपाल यांच्या हस्तें वितरित करण्यांत आलीं. त्याप्रसंगीं संघाध्यक्ष डॉ. पेंडसे हेहि उपस्थित होते.

संघाचा वार्षिकोत्सव

ता. ८-२-५३ ला शाखेचा वार्षिकोत्सव दासनवमीच्या दिवशीं नामदार पु. का. देशमुख, शिक्षण मंत्री यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला. त्याप्रसंगीं पूर्वाध्यक्ष डॉ. माधवराव देशमुख यांचें समर्थांच्या कार्यावर विचारपरिपूर्ण भाषण झालें. अध्यक्षांचे भाषणहि झालें. त्यावेळीं सौ. हिराबाईंच्या गायनाच्या उत्पन्नांतून शाखेतर्फे ७०१ रुपये केन्द्र समितीला देण्यांत आले.

शाखेच्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक

त्याच दिवशीं नवीन वर्षाकरितां पदाधिकाऱ्यांची निवडणूक होऊन खालील पदाधिकारी निवडून आले.

अध्यक्ष : श्रीमान् छोटूसाभाई छत्रीय
उपाध्यक्ष : श्री. सु. र. डोये
श्री. ग. गो. व्यवहारे
चिटणीस : ना. ग. डबीर
सहचिटणीस : श्री. प्र. शं. तनखीवाले
श्री. सा. बा. डोये
खजीनदार : श्री. ल. गो. पाठक
परीक्षा केन्द्राधिकारी : श्री. वि. अ. लिमये.

कार्यकारिणीचे सभासद

श्री. केशवराव इंगळे
श्री. स. गो. बापट
श्री. न. बा. पाळेकर
श्री. प्र. त्र्यं. घुसे
श्री. र. वि. पंडित
श्री. बा. का. देशमुख
श्री. ना. ह. तेलंग
श्री. ज. मु. देशपांडे
श्री. बा. ना. मार्डीकर
श्री. वि. गो. सरूरकर
श्री. ल. वि. मानकर
श्री. के. खं. कुलकर्णी
व श्री. भय्यासाहेब अलोनी (तिरोडा)

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नझूलच्या जागेबद्दल प्रश्न व ठराव

विदर्भ साहित्य संघशाखा गोंदिया व गुजराती राष्ट्रीय केळवाणी मंडळ यांनी नझूलची एकच जागा आपापल्या संस्थेकरिता मागितली होती. त्या जागेबाबत शाखेच्या सभासदांमध्ये कोणत्या अटीवर जागा गुजराती राष्ट्रीय शाळेला सोडून द्यावी याबद्दल मतभिन्नता झाल्यामुळे वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे, निधिसमितीचे अध्यक्ष न्यायमूर्ति अण्णासाहेब मंगळमूर्ति व श्री. नानासाहेब जोग हे येथे ता. २९-४-५३ च्या गोंदिया वि. सा. संघशाखेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत उपस्थित होते. परस्परांच्या मतांचा विचारविनियम झाल्यानंतर सन्माननीय पाहुण्यांनी खालील ठरावाप्रमाणे तडजोड घडवून आणली. व पुन्हा सभासदांत मतैक्य स्थापन करण्यांत स्पृहणीय यश मिळविलें. आभार-प्रदर्शनानंतर सभा आटोपली.

ठराव : "ज्याअर्थी शाखाध्यक्ष श्रीमान छोटूसाभाई यांना गुजराती राष्ट्रीय केळवाणी मंडळाच्या चालकांनी असें अभिवचन दिलें आहे की बांध्यांतील जागेऐवजी ज्या कोणत्या दुसऱ्या जागेसाठी विदर्भ साहित्य संघाची गोंदियाशाखा ज्या अधिकाऱ्याकडे मागणी करील, त्या मागणीला गुजराती राष्ट्रीय केळवाणी मंडळाचा पूर्ण पाठिंबा राहील, व मंडळाचें सहकार्यहि लाभेल, त्याअर्थी ही सभा असें ठरविते की बांध्यांतील जागेबद्दल ह्या विदर्भ साहित्य शाखेने केलेला अर्ज परत घ्यावा."

वरील ठराव अध्यक्षांनी मांडला व तो सर्वानुमतें स्वीकृत झाला.

सभासद नोंदणीचें काम फारच आस्थेने सुरू असून शंभराच्या वर सभासद नोंदविलें जातील अशी आशा आहे.

ना. ग. डबीर,
चिटणीस, वि. सा. संघ, गोंदियाशाखा

परीक्षा समिति, वि. सा. संघ १९५३–५४

संचालक—प्रा. पांडुरंग कृष्ण सावळापूरकर. सदस्य—प्रा. डॉ. वि. भि. कोलते, प्रा. डॉ. मा. गो. देशमुख, सौ. उषा कोलते. कार्यवाह—श्री. माणिक के. बैतुले.

वार्षिक कार्यक्रमः परीक्षा समिति १९५३–५४	सत्र १ः ऑग. ५३	सत्रः २ जाने. ५४
१ परीक्षा आरंभ	२३ ऑग. ५३	१६ जाने. ५४
२ नव्या केंद्रांकरितां आवेदनपत्र पाठविण्याची तारीख	५ जुलै ५३	१ डिसेंबर ५३
३ आवेदनपत्रें केंद्राधिकाऱ्यांकडे पाठविण्याची अंतिम तारीख	१५ जुलै ५३	१० डिसेंबर ५३
४ परीक्षा समितीकडे प. आवेदनपत्रें पाठविण्याची तारीख	२० जुलै ५३	१५ डिसेंबर ५३
५ परीक्षाफल घोषित होण्याची अंतिम तारीख	१ आक्टो. ५३	१ मार्च ५४
६ प्रमाणपत्रें प्राप्त होण्याची अंतिम तारीख	१ नोव्हें. ५३	१ मे ५४

माणिक के. बैतुले, कार्यवाह–परीक्षा समिति, वि. सा. संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सीमा समिति

सीमा समितीने सीमाविभागांत मराठीभाषेची कशी गळचेपी होते, तेथील मराठी जनतेच्या तक्रारी काय आहेत व त्यासाठी काय करायला पाहिजे याबद्दल विचार करून, सरकारला याबाबतींत योग्य ती दखल घेण्यास व मराठीभाषिकांवर अन्याय होणार नाही याबद्दल योग्य तें धोरण स्वीकारण्यास, जबलपूर येथील अधिवेशनांत मंजूर झालेला ठराव पाठवून, जाणीव करून दिली आहे. तसेंच सीमाविभागांतील तक्रारी बोलावून व कांही कार्यकर्ते पाठवून वस्तुस्थितीचा कानोसाहि घेण्याचा प्रयत्न केला. वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाचे एक वयस्क पण उत्साही व कळकळीचे सभासद कै. बा. ना. सहस्त्रबुद्धे यांनी गोंदिया – रायपूर कडील सीमारेषेवरील विभागांत दौरा काढून फार मोठी कामगिरी बजावली आहे. त्यांनी त्या विभागांत मराठीभाषेसंबंधी व तेथील मराठी जनतेसंबंधी कांही तक्रारी केन्द्रीय कार्यालयाकडे पाठविल्या. त्याचप्रमाणें श्री ए. श्री. पटवर्धन व प्रा. ना. बा. शास्त्री यांनीहि याबाबत दखल घेऊन सहकार्य दिलें.

श्री. बा. ना. सहस्त्रबुद्धे यांच्या जानेवारी १९५३ मध्ये झालेल्या आकस्मिक निधनामुळे वि. सा. संघाची मोठी हानि झाली आहे.

वि. सा. संघशाखा व संलग्नसंस्था

या वर्षी भंडारा येथे वि. सा. संघाची शाखा स्थापन झाली आहे. 'भारतीय भाषाध्ययन मंदिर' आणि गुरुकुंज–मोझरी येथील 'श्री गुरुदेव प्रकाशन मंडळ' या दोन संस्था वि. सा. संघाच्या संलग्न संस्था झाल्या आहेत. अमरावती, भंडारा व गोंदिया येथील संघशाखांनी अधिकाधिक सदस्यसंख्या वाढवून व विविध कार्यक्रम घडवून वि. सा. संघाला बळकटी आणण्याचा स्तुत्य प्रयत्न केला.

निवडणुकी

वि. सा. संघाच्या १९५३–५४ सालच्या निवडणुकी मार्चच्या दुसऱ्या आठवड्यांत होऊन नवीन संघाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कार्यकारी मंडळ निवडून आलें. कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीसाठी संघाध्यक्ष डॉ. शं. दा. पेंडसे यांनी अतिशय दक्षतेने आणि बरेच श्रम घेऊन, निवडणुकीची जबाबदारी पार पाडली. या कामीं नियुक्त केलेल्या, श्री. भाऊराव भोयर व श्री. स. वि लिमये या गणकांनी मतमोजणीचें व आपला निकाल अध्यक्षांना सादर करण्याचें कार्य फार जोखमीने व कांटेकोर पद्धतीनें केले, याबद्दल आम्ही उभयतांचे फार आभारी आहोंत.

त्याचप्रमाणे लवाद म्हणून निवडले गेलेले डॉ. य. खु. देशपांडे यांचेहि आम्ही फार आभारी आहोंत.

या संपूर्ण वर्षांत, वाढता कारभार व वाढती जबाबदारी लक्षांत घेऊन अधिकृत हिशेबतपासनीस श्री. महेश्वरराव गद्रे आणि त्यांचे सहकारी श्री. चन्द्रकांत कृष्णराव साठे यांनी वेळोवेळीं सल्ला देऊन व हिशेबाचे बाबतींत योग्य मार्गदर्शन करून आम्हाला उपकृत केलें आहे. वार्षिक हिशेब तपासण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम कसे विसरतां येतील ? हिशेबनीस श्री. द. कृ. गोडबोले यांच्याहि सहकार्याचा उल्लेख करणें अवश्य आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कार्यकर्त्यांचें सहकार्य व आभार

त्याचप्रमाणे वि. सा. संघाच्या कोषाध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी, त्यांच्या थोरल्या मुलाच्या शोचनीय मृत्यूचा जबर आघात झाला असतांहि, वि. सा. संघाचें दप्तर पद्धतशीर व व्यवस्थित राखण्याच्या व हिशेब चोख ठेवण्याच्या बाबतींत जें मोलाचें सहकार्य दिलें, त्याची विस्मृति कशी होणार ?

वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी ज्या कळकळीने व आपुलकीने आमच्या सर्व कामांत, हरप्रसंगीं आपलीं महत्त्वाचीं कामें बाजूला सारून, जी मदत केली तिचें मोल आम्ही काय मापणार ? त्याचप्रमाणे वि. सा. संघाचे ट्रस्टी न्यायमूर्ति मंगळमूर्ति व उपाध्यक्ष श्री. बाबासाहेब देशपांडे यांचें कुशल मार्गदर्शन तर आम्हाला कार्य वेळच्या वेळीं व्यवस्थितपणे पार पाडायला कारणीभूत झालें, तद्वत्च संघाध्यक्ष डॉ. शं. दा. पेंडसे यांचा खंबीर आधार व त्यांची कार्यतत्परता आम्हाला संबंध वर्षाचें जबाबदारीचें भरदार ओझें वाहण्यास विशेषत्वाने कामीं आली, याबद्दल आम्ही मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतों.

याशिवाय डॉ. वि. भि. कोलते, प्रा. वा. कृ. चोरघडे, प्रां. श्री. ना. बनहट्टी, डॉ. मा. गो. देशमुख, सौ. उषाताई कोलते, श्री. रा. पु. सगदेव, न्या. मू. काकासाहेब पुराणिक, श्री. नानासाहेब जोग, श्री. नानासाहेब ओगले, श्री. ए. श्री. पटवर्धन, कु. ताराबाई प्रधान, श्री. पां. बा. गडकरी, श्री. श. वा. रानडे सौ. विमलाताई देशपांडे, श्री. र. वि. कुळकर्णी प्रा. श्री. वि. गंधे. श्री. नाना सोन्डुले आदि कार्यकर्त्यांनी कळकळीने वेळोवेळीं सहकार्य दिल्याबद्दल त्यांना धन्यवाद.

कार्यालयीन कार्याच्या बाबतींत श्री. मनोहरपंत जुनघरे यांनी जे कष्ट घेऊन व आम्हाला एका हाकेसरशी 'ओ' देऊन जें सहकार्य दिलें त्याचा आम्हाला स्वतंत्रपणे उल्लेख करणें भाग आहे. तसेंच श्री. हरिहरराव येगावकर यांचाहि साभार उल्लेख करणें अवश्य आहे. संघलेखक श्री. साखळे यांनी आपल्या कामाच्या वेळा सांभाळूनहि, जी अविश्रांत साथ दिली, तिचा नामनिर्देश न करणें अन्यायाचें होईल.

कार्यासाठी अधिकाधिक सहकार्याची अपेक्षा

१९५२-५३ सालचें संक्षिप्त असें हें कार्यवृत्त आहे, तरी त्यावरून वि. सा. संघाचें कार्य केवढें वाढलें आहे व दिवसेंदिवस केवढी जबाबदारी वाढत आहे याची यथार्थ कल्पना येईल. वि. सा. संघाच्या भरदार कार्यांची व्याप्ति व जबाबदारी लक्षांत घेऊन, ज्या अनेक अडचणी निर्माण होतात. व त्यासाठी किती खपावें लागतें हें ध्यानीं घेऊन, यापुढे कार्य सुव्यवस्थित व सुगम करण्याच्या दृष्टीने सर्वांनी जातीने सहकार्य द्यावें व तसेंच कार्यालयाचीं कामें वेळच्या वेळीं पार पाडण्यासाठी नोकरवर्गांतहि वाढ व्हावी, असें विनम्रपणे सूचवून व वर्षांत आमच्याकडून कांही कमीअधिक घडलें असल्यास त्याबद्दल उदार अंतःकरणाने आम्हाला क्षमा करावी, अशी विनंती करून, हें अल्पसें कार्यवृत्त आम्ही सादर केलें आहे.

दिनांक
२६-४-१९५३

ह. ना. नेने
सरचिटणीस
ना. रा. शेंडे
चिटणीस

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Receipts & Payments Statement For The Period From 1-4-1952 to 31-3-53.

Receipts

To Opening Balance :—		
Cash in hand	289-13-1	
Cash in Bank	8227-14-0	
Fixed Deposit	2000- 0-0	
		10,517-11-1
Subscriptions :—		
Old Members	2867-11-6	
Life Members	1864- 0-0	
		4,731-11-6
Receipts from Royalties	11,508-13-0	
Examination Fees	2,419- 6-0	
Miscellaneous Receipts	55- 2-0	
Government Grant	5,000- 0-0	
Donations to Bldg : Fund	16,895- 0-0	
Gadkari Memorial Fund	4,954-15-0	
Sanskritic Samiti	1,395- 6-0	
Mr. Parvekar Deshmukh Prize	300- 0-0	
Donation for Oil Painting of Shri Kolhatkar	40- 0-0	
Interest Earned	73- 9-3	
		57,891-9-10

Payments

By Salaries to Staff	1,465-11-3	
" Postage & Telegrams	271- 8-3	
" Printing & Stationery	3,259- 8-0	
" Yugawani Publication	3,001-11-3	
" Travelling & Conveyance	783- 4-9	
" Miscellaneous Expenses	449- 8-0	
" Meetings, Cultural Activities. Functions etc.	964- 0-6	
Electrical Charges	169-15-0	
" Expenses on Mandir Samiti[Bldg.Com.]	20,982- 7-9	
" Purchases of Articles	2,222-11-6	
Bank Commission	7- 2-0	
Examinations Expenses	295-11-6	
Fixed Deposits	3 000- 0-0	
" Branches' Share [Ansbadan]	42- 8-0	
Shri Ogale [for "Muhurt"]	600- 0-0	
" Advances to Staff	100- 0-0	
" Shri Gadkari [Gadkari Smarak Samiti]	491-11-0	
" Drama Expenses	885-10-0	
" Mr. Parvekar Deshmukh Prize to Shri Wadegaonkar	300- 0-0	
Closing Balance :—		
Cash in hand	259-10-4	
Cash in Bank	18.338-14-9	
		18.598- 9-1
		57, 891- 9-10

CERTIFICATE : Certified that the figures shown in the above Receipts & Payments Statements of the Vidarbha Sahitya Sangh, Nagpur, agree with the books of accounts maintained which have been audited by us and are found to be correct.

Dated, Nagpur, the 26th April 1953.

S/d. **Maheshwar Gadre**
CHARTERED ACCOUNTANT

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर [म. प्र.]

दिनांक १-४-५२ ते दिनांक ३१-३-५३ पर्यंतचा

जमाखर्चाचा तक्ता *

जमा

आरंभींची शिल्लक :		
नगदी (जवळ)	२८९-१३-१	
बँकेंत	८२२७-१४-०	
मुदतीची ठेव (फिक्स्ड डिपॉझिट)	२०००- ०-०	
		१०,५१७-११-१
वर्गणी		
साधारण सभासद	२८६७-११-६	
आजीव सभासद	१८६४- ०-०	
		४,७३१-११-६
पाठ्यपुस्तक प्रतिलिपि अधिकार		११,५०८-१३-०
परीक्षा शुल्क		२,४१९- ६-०
किरकोळ जमा		५५- २-०
शासनानुदान		५,०००- ०-०
मंदिरनिधि		१६,८९५- ०-०
गडकरीस्मारकनिधि		४,९५४-१५-०
सांस्कृतिकसमिति		१,३९५- ६-०
श्री.पारवेकर देशमुख वक्षीस		३००- ०-०
कोल्हटकरांच्या तैलचित्रासाठी देणगी		४०- ०-०
ठेवींचें व्याज		७३- ९-३
		५७,८९१- ९-१०

खर्च

वेतन खर्च		१,४६५-११-३
पोस्ट व टेलिग्राम		२७१- ८-३
मुद्रण व स्टेशनरी		३,२५९- ८-०
युगवाणी मुद्रण		३,००१-११-३
वाहन व प्रवास		७८३- ४-९
किरकोळ		४४९- ८-०
सभा, सांस्कृतिक कार्यक्रम वगैरे		९६४- ०-६
वीज		१६९-१५-०
मंदिर समितिखर्च		२०,९८२- ७-९
वस्तु खरेदी		२,२२२-११-६
बँक-कमिशन		७- २-०
परीक्षासमिति खर्च		२९५-११-६
मुदतीची ठेव (फिक्स्ड डिपॉझिट)		३,०००- ०-०
अंशदान		४२- ८-०
श्री. ओगले (मुहूर्तासाठी)		६००- ०-०
नोकरांना 'अॅडव्हान्स'		१००- ०-०
श्री. गडकरी (गडकरी समिति)		४९१-११-०
नाटक खर्च		८८५-१०-०
श्री पारवेकर देशमुख वक्षीस (श्री वाडेगांवकर यांना)		३००- ०-०
वर्ष अखेर शिल्लक		
नगदी (जवळ)	२५९-१०-४	
बँकेंत	१८,३३८-१४-९	
		१८,५९८- ९-१
		५७,८९१- ९-१०

प्रमाणपत्र : वि. सा. संघ नागपूर या संस्थेच्या जमाखर्चाच्या तक्त्यांत वर दिलेले आंकडे, संघाच्या जमाखर्चाच्या पुस्तकाशीं तंतोतंत जुळतात आणि हीं पुस्तकें आम्ही तपासलीं असून तीं बरोबर आहेत असें प्रमाणपत्र आम्ही देतों.

नागपूर, दि. २६ एप्रिल १९५३

(सही) महेश्वर गद्रे
अधिकृत हिशेबनीस

---

* सोबतच्या इंग्रजी जमा-खर्चाच्या तक्त्याचें मराठी भाषांतर सभासदांच्या सोयीसाठी दिलें आहे.

—सरचिटणीस, वि. सा. संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

BUILDING COMMITTEE (Mandir Samiti)

Vidarbha Sahitya Sangh

Receipts and Payments Statement For The Period From 1st Apr. 1952 to 31st March 53.

Receipts		Payments	
Opening Palance	9- 5-6	Postage	50- 8-3
Total Withdrawals from Buiding Fund A\C	21,020-13-6	Salaries	291- 0-0
		Conveyance	213- 6-0
		Electric Installations	149- 4-9
		Water Pipelines	837-12-0
		Muhurta Ceremony	17- 8-0
		Planning	400- 4-0
		Stationery	55-11-0
		Tools	56- 0-0
		Implements	36- 9-6
		Levelling, Gardening etc.	239- 9-0
		Fencing, Gates, Culverts & c	1,121- 3-6
		Temporary Shed, Steel Enclosure etc.	1,559-10-6
		Cement	4,322- 6-0
		Office Establishment	209-13-6
		Constructions Wages	30- 4-0
		Stone Metal	42- 0-0
		Lime Mortar	12- 8-0
		Bricks	91- 0-0
		Sand	63- 0-0
		Steel	10,663-12-6
		Miscellaneous	0-12-0
		Varnishes, Paints etc.	18-15-6
		Refunded to Building Fund A\C	331- 5-9
		Closing Balances :	215-14-6
	21,030-3-0		21,030-3-0

Dated, Nagpur, the 26th April 1953.

Checked & Found Correct.
S|d Maheshwar Gadre
CHARTERED ACCOUNTANT

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मंदिरसमिति : विदर्भ साहित्य संघ

दिनांक १-४-५२ ते ३१ मार्च १९५३ पर्यंतचा

जमाखर्चाचा तक्ता

जमा		खर्च	
आरंभीची शिल्लक	९- ५-६	पोस्टेज	५०- ८-३
मंदिरनिधींतून एकूण काढलेली रक्कम	२१,०२०-१३-६	वेतन	२९१- ०-०
		वाहनखर्च	२१३- ६-०
		वीज-इन्स्टालेशन्स	१४९- ४-९
		वॉटर-पाईपलाईन	८३७-१२-९
		मुहूर्तसमारंभ	१७- ८-०
		प्लॅनिंग	४००- ४-०
		स्टेशनरी	५५-११-०
		हत्यारें (tools)	५६- ०-०
		अवजारें (Implements)	३६- ९-६
		लेव्हलिंग, गार्डनिंग इ.	२३९- ९-०
		फेन्सिंग, गेटस्, कलव्हर्टस्	१,१२१- ३-६
		टेंपररी शेड, स्टील एन्क्लोजर इ.	१,५५९-१०-६
		सीमेंट	४,३२२- ६-०
		ऑफिस एस्टाब्लिशमेंट	२०९-१३-६
		बांधकाम-मजुरी	३०- ४-०
		गिट्टी	४२- ०-०
		चुना	१२- ८-०
		विटा	९१- ०-०
		वाळू	६३- ०-०
		पोलाद	१०,६६३-१२-६
		फिरकोळ	०-१२-०
		वॉरनिश, पेंटस् इ.	१८-१५-६
		रिफंड टु मंदिरनिधि	३३१- ५-९
		नगदी शिल्लक	२१५-१४-६
	२१,०३०- ३-०		२१,०३०- ३-०

नागपूर, दि. २६ एप्रिल १९५३

तपासलें व तें बरोबर आहे.

(सही) महेश्वर गद्रे

अधिकृत हिशेबनीस

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

[आम्रमहिमा पृष्ठ २८ वरून]

आणि आइकौनि अंब्रफळाची गोडी उत्तती[1] ॥ चिरमटौनि जाली कोरडी ॥ लाजा माथियावरि घेतली पोतडी ॥ रिगाली वानपुत्रा आंतु ॥१५॥ ऐसी अंब्रफळाची देखौनि पवित्रता ॥ पोफळी करवता[2] घेतला माथा ॥ म्हणे आंबेया सारिखें जगन्नाथा ॥ करि आमतें ॥१६॥ हटें आंबेया जवाळि येउनि बैसली बोरें ॥ तें म्हणति आम्हीं वरिष्ठें थोरें ॥ तवं केर्जी[3] येउनिआली आंडोरें[4] ॥१७॥ तेणें तुक[5] तुटलें[6] ॥१८॥ तया अंब्रफळातें देखौनि रागेंनि ॥ वरि करुं आली वोवाळणी ॥ म्हणे आंबेयावांचौनी ये मेदिनीं[7] ॥ दुजें न देखों फळ ॥१९॥ तेथ इडें[8] मातुलिगें[9] सांगो काइ ॥ कमरुखें जंबिरें लागताति आंबेयाचां पाइं ॥ नारंगें नींबोणी म्हणेति[10] वाइं ॥ जन्मलों आम्ही ॥२०॥ ऐसें अंब्रफळ देखौनि नएनीं[11] ॥ कोहळीं पांढरी जालीं सारटणीं ॥ काळि वेगें कांकडिया लाजौनि ॥ जिवित तेजुं[12] पाहाति[12] ॥२१॥ ऐसें अंब्रफळ आइकौनि गोड ॥ पडवळिं गळाचे सोडिले दगड ॥ मग राजबोर्दी मधिं पडिले[13] आड[13] ॥ तेया आंबेयासिं ॥२२॥ ऐसें उमेयां राजबोर्दी मोकळें ॥ रागें नडतडां उडतें तोंडलें ॥ आंबेयातें देखौनि अभिमानें मळें ॥ म्हणे जितलें अंब्रफळें ॥२३॥ तवं कारलें करूं आलें वाद ॥ म्हणे आंबेयासीं करीन संवाद ॥ आंबा म्हणे 'सर, तुं कडु' आंगा आलिया दादु[14] ॥ बोलतां लाजेसि ना ॥२४॥ तवं दोडिका आला माहा विरु ॥ तो म्हणे मी फळांमधिं दशाशिरु[15] ॥ परि आंबेयासि करितां बडिवार[16] ॥ पुरवेना[17] ॥२५॥ तवं बोलिलें तुंबें[18] सकळै॥ जन्ही लागलों वीण घंबाळीं ॥ तेणें राज्यमान[19] जालों परि अंब्रफळीं जितिलें गोडपणें ॥२६॥ तवं कैसें बोलिलें वांगें ॥ आतां टाईचि राहिजे उगें ॥ केळें द्राक्षें पडलीं मागें तेथ तुम्ही काई ॥२७॥ ऐसीं सकळ फळें जितलीं वरिष्ठपणें ॥ अंब्रफळा येश आलें अतिमानें ॥ आतां आम्ररसु देखौनि सकळपा हाकारणें ॥ सांधैन वर्तलें कैसें ॥२८॥ [क्रमशः]

---

१ खारका. २ करवती समान पानें. ३ मोबदल्यासाठी द्यावयाचें धान्य. ४ पोरें. ५ वजन ६ कमी झालें; पत गेली. ७ पृथ्वीवर. ८ इंडलिंबें. ९ महाळुंगें. १० फुकट, वृथा. ११ डोळ्यांनी. १२ टाकूं लागली. १३ शरण गेले. १४ पुटकुळया, बारीक फोड. १५ दहा डोक्याचा. १६ प्रौढी. १७ पुरें पडणें जमेना. १८ कडुभोपळे. १९ राजमान्य झालों.

'युगवाणी'च्या लेखकांस सूचना--

(१) लेख सुवाच्य अक्षरांत कागदाच्या एका बाजूने माया सोडून लिहावा

(२) कोणताहि लेख शक्यतों 'युगवाणी'च्या सुमारें पांच पानांहून अधिक नसावा.

(३) पुरेसें टपालहशील असल्याशिवाय अस्वीकृत लिखाण परत केलें जाणार नाही.

(४) लेखकांनी नवीन शुद्धलेखनाचे नियम पाळावेत.

(५) स्वीकृत लिखाण यथावकाश प्रसिद्ध होईल. ह्यासाठी लेखकांनी वृथा पत्रव्यवहाराचा त्रास घेऊं नये.

संपादक 'युगवाणी'

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ररींसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

मासिक, मे-जून १९५३

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना विनामूल्य :: सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथाच्या प्रकाशनाचें कार्य जोमाने सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपाने आर्थिक धडाडीने करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटाने चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

मुद्रक : प. वि. वेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ